❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | गुरुवार, दि. ०६ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २२२ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार






# औद्योगिक विकासाला चालना द्यावी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : मुख्यमंत्र्यांकडून एमआयडीसीअंतर्गत प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यामध्ये नवीन औद्योगिक वसाहतींचा विस्तार वेगाने होत आहे. या विस्तारातूनच औद्योगिक विकास होणार आहे. त्यामुळे उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. गतिमान भूसंपादन करून महाराष्ट्रात औद्योगिक विकासाला चालना द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एमआयडीसीअंतर्गत विविध प्रकल्पांच्या भूसंपादनासंदर्भात आढावा बैठक वर्षा निवासस्थान येथे झाली, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, यांच्यासह संबंधित विविध वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, औद्योगिक भूखंड वाटप प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी 'मिलाप' या ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज, रिअल-टाईम ट्रॅकिंग, ऑफर लेटर आणि वाटप आदेशांचे स्वयंचलित वितरण; तसेच डॅशबोर्ड सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राज्यात १,१८३ औद्योगिक भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. त्यातून ५,५०२ कोटींचा महसूल प्राप्त झाला आहे.

राज्यात सध्या ६६ हजार ३४३ एकर जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, पुणे, पालघर, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, नाशिक आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये ही प्रक्रिया सुरू आहे. राज्यातील ९७ सामंजस्य करारांतर्गत सुमारे ७५ हजार २३४ एकर जमिनीची मागणी आहे. त्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उच्चाधिकार समिती स्तरावरील मंजुरी, विविध प्रशासकीय टप्पे; तसेच वनविषयक परवानग्यांमुळे होणारा विलंब कमी करण्यासाठी प्रक्रिया अधिक सुलभ करावी. उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध व्हावी आणि गुंतवणूक प्रकल्पांना गती मिळावी, यासाठी अनावश्यक प्रशासकीय टप्पे कमी करण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. प्रकल्पाचे स्वरूप आणि गुंतवणुकीच्या प्रमाणानुसार भूखंड विकासासाठी निश्चित कालमर्यादा ठरवण्यात यावी. निर्धारित मुदतीत बांधकाम सुरू करणे बंधनकारक राहणार असून, विकासात विलंब झाल्यास टप्प्याटप्प्याने दंड आकारणे; तसेच आवश्यकतेनुसार भूखंड पुन्हा ताब्यात घेण्याची तरतूदही प्रस्तावित करावी.

## 'पिंक ई-रिक्षा'साठी अडथळ्यांचीच वाट; महिलांकडून प्रतिसाद का नाही?

■ पुणे (दै. संध्या)



राज्य सरकारने महिलांसाठीच्या 'पिंक ई-ऑटो' योजनेतील अनुदान २० टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत वाढविले. मात्र, अपुरी माहिती, गुंतागुंतीची प्रकिया, आर्थिक अडचणी आणि त्यात उत्पन्नाच्या शंकेमुळे महिलांकडून या योजनेला प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे.

परिसर आणि 'असर सोशल इम्पॅक्ट ॲडव्हायझर्स' या संस्थांनी केलेल्या स्वतंत्र सर्वेक्षणात योजनेच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे असल्याचे समोर आले आहे. अपुरी माहिती, कागदपत्रांची गुंतागुंत, अर्ज प्रक्रियेला होणारा विलंब, स्वतःचा वाटा उचलण्यासाठी येणाऱ्या आर्थिक अडचणी, कर्ज मंजुरीतील अडथळे आणि व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाची शंका आदी कारणांमुळे महिलांकडून या योजनेला प्रतिसाद मिळत नसल्याचे प्रत्यक्षात स्वीकारणे कठीण जात असल्याचे सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

राज्यातील १७ शहरांतील १० हजार महिलांना 'पिंक ई-रिक्षा' देण्याचे उद्दिष्ट सुरुवातीला ठेवण्यात आले होते. त्यात पुण्यासाठी १ हजार ४००, पिंपरी-चिंचवडसाठी ६०० पिंक ई-रिक्षांचा समावेश होता. त्यानंतर पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांची संख्या वाढवून ४ हजारापर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या वर्षाअखेर पाच हजार महिलांना पिंक ई-रिक्षा देणार असल्याचे आश्वासन विधिमंडळात दिले. लाभार्थी महिलांची संख्या वाढविण्यासाठी २० टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत अनुदान वाढ करण्यात आली. मात्र, अद्यापही महिलांकडून प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. पुणे जिल्ह्यासाठी सुमारे चार हजार 'पिंक ई-रिक्षा'चे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र, आतापर्यंत केवळ १७ महिलांकडेच पिंक ई-रिक्षा आहे. दरम्यान, अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यासह जिल्हास्तरावर तक्रार निवारण यंत्रणा, मेट्रो स्थानके आणि महत्त्वाच्या गर्दीच्या ठिकाणी 'पिंक ई-ऑटो'साठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करावी, अशा शिफारसीही या सर्वेक्षणात करण्यात आल्या आहेत. अनुदानातील वाढ हा स्वागतार्ह आहे. पण, वेळेत अंमलबजावणी आणि संस्थात्मक पाठबळाशिवाय या योजनेचा लाभ महिलांपर्यंत पोहोचणार नाही. योजनेची प्रसिद्धी अजूनही कमीच आहे. महिला आणि बालविकास विभागाने या उपक्रमाबाबत व्यापक जनजागृती करण्याची गरज आहे. पुरुष रिक्षाचालकांमध्ये जनजागृती करून महिला चालकांना रिक्षा स्टँडचा समान वापर करता यावा, यासाठीही प्रयत्न होणे आवश्यक आहे.

## थोडक्यात...



### दोघा शेतकऱ्यांचा शेततळ्यात बुडून मृत्यू

राहाता : दैनिक संध्या

शेतातील पिकांवर फवारणी करण्यासाठी पाणी घेण्यास गेलेल्या दोन तरुण शेतकऱ्यांचा शेततळ्यातील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना कोपरगाव तालुक्यातील बाहदराबाद येथे आज, बुधवारी घडली. या घटनेमुळे बाहदराबाद गावावर शोककळा पसरली असून दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावातील दोन कर्त्या, मेहनती शेतकऱ्यांचा अशा दुर्दैवी पद्धतीने मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. दीपक रामचंद्र पाचोरे (वय ३३) आणि प्रशांत गीतराम पाचोरे (वय ३४ दोघेही रा. बाहदराबाद) असे मृत तरूणांची नावे आहे. दोघेही शेती व्यवसाय करीत असल्याने अपापल्या कुटुंबाचा आधार होते. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास दोघेही शेतातील पिकांवर औषध फवारणीसाठी शेततळ्यातून पाणी काढण्यास गेले होते. शेततळ्यावर गेल्यानंतर दीपक पाचोरे यांचा अचानक तोल गेला आणि ते पाण्यात पडल्याने त्यांना वाचविण्याच्या प्रयत्नात प्रशांत पाचोरे यांनी शेततळ्यात उडी घेतली. दुर्दैवाने दोघांचा बुडून मृत्यू झाला.

### जप्त केलेला टेम्पो चोरीला

अहिल्यानगर : दैनिक संध्या

पोलिसांनी जप्त करून पोलीस ठाण्याच्या आवारात ठेवलेला टेम्पो त्यातील अत्याधुनिक ध्वनीवर्धक साहित्यासह (डीजे साहित्य) चोरीला गेल्याची खळबळजनक घटना नगरमध्ये घडली. या संदर्भात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात वाहनचोरीचा गुन्हा दोघा संशयितांविरुद्ध दाखल करण्यात आला आहे. नगर शहराजवळील भिंगार छावणी परिषदेच्या हद्दीत नगर तालुका पोलीस ठाणे आहे. या पोलीस ठाण्याच्या आवारात भिंगार कॅम्प पोलीसांनी जप्त केलेला टाटा कंपनीचा टेम्पो (एमएच १६ बी ३६५६) व त्यातील डीजे साहित्य ठेवण्यात आले होते. हा टेम्पो २ ऑगस्टच्या मध्यरात्री पावणेएक ते तीन ऑगस्टच्या सकाळी नऊ दरम्यान चोरीला गेल्याचे आढळले आहे. भिंगार कॅम्प पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार गेल्या शनिवारी (दि. १) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती होती. या जयंतीची भिंगार उपनगरात मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणूकदरम्यान भिंगार कॅम्प पोलिसांनी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने तसेच ध्वनीप्रदूषण कायद्यान्वये टेम्पो जप्त केला.

### फक्त कागदावरच होते 'ते' १० कर्मचारी!

अहिल्यानगर : दैनिक संध्या

मुंबई पोलीस दलात ज्यांनी कामच केले नाही, अशा १० कर्मचाऱ्यांच्या वेतनावर दोन वर्षांत ६.४ कोटी रुपये खर्च केल्याची बाब समोर आली आहे. २०१९ ते २०२० साली घडलेल्या या घोटाळ्याचा तपास आता मुंबई गुन्हे अन्वेषण विभागाकडे देण्यात आला आहे. हे १० कर्मचारी फक्त अधिकृत नोंदीमध्येच अस्तित्वात होते. त्यांनी कधीही मुंबई पोलीस दलात काम केले नाही. तरीही त्यांच्या खात्यात दोन वर्ष वेतन जमा होत होते, यामुळे सरकारी तिजोरीतून ६.४१ कोटी रुपये लाटले गेले.

## अहिल्यानगरमध्ये प्रत्येक पोलीस ठाण्यात अमली पदार्थविरोधी पथक

■ अहिल्यानगर (दै. संध्या)

■ सात महिन्यात १.७८ कोटींचे अमली पदार्थ जप्त

अमली पदार्थांबाबत पोलिस दल सतर्क आहे. या विरोधात कठोरपणे कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात एक अधिकारी व चार कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र पथक नियुक्त करण्यात आले आहे. गेल्या सात महिन्यात १ कोटी ७८ लाख ५७ हजार ८१० रुपये किंमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिली. तरुण पिढीला अमली पदार्थांच्या विळख्यातून सोडवण्यासाठी तसेच जिल्हा अमली पदार्थमुक्त करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलीस दलाच्या वतीने गुरुवारी (दि. ६) अमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. त्याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत पोलीस अधीक्षक सुदर्शन बोलत होते. यावेळी अतिरिक्त पोलिस अधीक्षक वैभव कलबुर्मे, शहर पोलीस अधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक संतोष मुटकुळे उपस्थित होते.



अफू, गांजा या अमली पदार्थांपेक्षा एमडी पदार्थांचा शोध घेणे कठीण आहे. मात्र गोपनीय माहिती काढण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत. तोफखाना, एमआयडीसी व संगमनेरमध्ये अशा स्वरूपाची कारवाई करण्यात आली आहे. याबाबत आराखडा तयार केला जात आहे. शाळा, महाविद्यालयभोवती असलेल्या पान टपऱ्यातून मादक पदार्थांची विक्री केली जात आहे का याचीही माहिती घेतली जात आहे. महापालिका, नगरपालिकांनी अनधिकृत टपऱ्या हटवण्याची मोहीम सुरू केल्यास आवश्यक तेव्हा पोलीस बंदोबस्त दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात १ जानेवारी ते ३१ जुलै अखेर अमली पदार्थ विरोधी ३२ गुन्हे दाखल करण्यात आले त्यामध्ये ५९ आरोपी निष्पन्न झाले आहेत. ६४० किलो १७७ ग्रॅम अमली पदार्थ जप्त करण्यात आले. त्याची किंमत एकूण १ कोटी ७८ लाख ५७ हजार ८१० रुपये आहे. याबरोबरच अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या २९६ जणांविरुद्ध ३६५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशीही माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी दिली.

## वाल्मिक कराडची रवानगी नागपूर कारागृहात करा

■ बीड (दै. संध्या)



बीडमधील मस्साजोग गावचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केली असून सत्र न्यायालयाने वाल्मिक कराडसह सर्व आरोपींवर आरोप निश्चित केले आहेत. हा खटला ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम लढवत आहेत.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात आता एक अपडेट समोर आली आहे. आरोपी वाल्मिक कराडची बीड कारागृहामधून नागपूर मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्याची मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या संदर्भात सुप्रिया सुळे यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर केली आहे. तसेच पोस्टमध्ये धनंजय देशमुख यांनी कारागृह अधीक्षकांना लिहिलेल्या पत्राचा संदर्भही दिला आहे. "मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येतील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला बीड जिल्हा कारागृहात राजकीय प्रभावामुळे बेकायदेशीर सुविधा दिल्या जात असल्याचा गंभीर आरोप संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी कारागृह अधीक्षकांना लिहिलेल्या पत्राद्वारे केला आहे. यामध्ये इतर कैद्यांच्या नावावरून आणि वकिलांच्या सिमकार्डद्वारे बाहेरील व्यक्तींशी संपर्क साधणे, दुपारच्या बंदीच्या काळात अधीक्षक कार्यालयात बसवून नियमबाह्य पद्धतीने व्हिडीओ कॉल सुविधा पुरविणे, बराक क्र.९ जवळील फोनजवळ सीसीटीव्ही कॅमेरा नसणे आणि कारागृहातूनच बीडमधील परिस्थितीवर प्रभाव टाकून इतर आरोपींच्या मदतीने दहशत निर्माण करणे आदी मुद्दे नमूद आहेत."

"न्यायप्रक्रियेचा हा थेट अपमान असून माझी मुख्यमंत्र्यांना मागणी आहे की कृपया सदर आरोपीची बीड कारागृहातून नागपूर मध्यवर्ती कारागृहात रवानगी करावी, बीड कारागृहातील सीसीटीव्ही फुटेज, कॉल लॉग आणि भेट नोंदवही जप्त करून वरिष्ठ स्तरावर चौकशी व्हावी, आरोपीला मदत करणाऱ्या संबंधित कारागृह अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, पीडित देशमुख कुटुंबाला न्याय मिळणं, यासाठी आमचं प्राधान्य असून यासाठी आम्ही आग्रही आहोत", असं खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.

# ॲनालॉग पनीरवर वर्षभरासाठी बंदी



■ मुंबई (दै. संध्या)

### तुकाराम मुंढे यांचा मोठा दणका

राज्यात पनीरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या अनलॉग किंवा दुग्धेतर पनीरच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर राज्य सरकारने एक वर्षासाठी बंदी घातली आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुरुवारी यासंदर्भातील आदेश जारी केला. राज्यभरातील तपासणीत पनीरचे ३५.४ टक्के नमुने विहित मानकांशी विसंगत आढळल्याने आणि अनेक नमुन्यांमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य स्निग्धांशाचा वापर झाल्याचे स्पष्ट झाल्याने सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. भाजपचे श्रीगोंदाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी विधिमंडळात प्रश्न उपस्थित करून याबाबत पाठपुरावा केला होता. पाचपुते यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांना पत्र लिहून राज्यात पनीरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या ॲनालॉग किंवा दुग्धेतर पनीरवर बंदी घालण्याची मागणी केली होती. ग्राहकांची दिशाभूल होत असून अशा उत्पादनांमुळे आरोग्यालाही धोका निर्माण होत असल्याचा मुद्दा त्यांनी पत्रात उपस्थित केला होता. या बंदीचे स्वागत करत, अध्यादेशाची पूर्ण ताकदीने अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा पाचपुते यांनी बोलताना व्यक्त केली. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभरातून गोळा करण्यात आलेल्या ३०८ नमुन्यांच्या तपासणीत १०९ नमुने निकृष्ट किंवा असुरक्षित असल्याचे आढळले. त्यापैकी ७९ नमुने निकृष्ट दर्जाचे तर ३० नमुने थेट असुरक्षित असल्याचा प्रयोगशाळेचा अहवाल आहे. तपासणीत अनेक नमुन्यांमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य स्निग्धांश वापरण्यात आल्याचेही निष्पन्न झाले. दुधातील फॅट्स किंवा घटक काढून, त्याऐवजी वनस्पतीजन्य तेल, डालडा किंवा इतर दुधाव्यतिरिक्तच्या वस्तू वापरून बनवलेल्या पदार्थाला (ॲनालॉग) किंवा 'दुग्धेतर पनीर' म्हटले जाईल.

### बंदी आदेश काय म्हणतो ?

- उत्पादनापासून ते किरकोळ विक्रीपर्यंतच्या सर्व व्यवहारांवर राजपत्रात आदेश प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षासाठी बंदी
- हॉटेल, रेस्टॉरंट, केटरर्स, क्लाऊड किचन आणि इतर खाद्यसेवा आस्थापनांनाही अशा दुग्धेतर पनीरचा कोणत्याही खाद्यपदार्थात वापर करता येणार नाही.
- ग्राहकांना ते अस्सल पनीर म्हणून देणे किंवा त्याबाबत माहिती लपविणे ही अनुचित व्यापार पद्धत मानून कारवाई केली जाईल.
- पनीर किंवा छेना विकणाऱ्या सर्व अन्न व्यवसायिकांना पॅकेजिंग व लेबलिंगबाबत अन्न सुरक्षा नियमांचे पालन करणे बंधनकारक.
- आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत दंडात्मक कारवाई

### आतापर्यंत ५५.७२ कोटी रुपयांचा एकूण २८,६६,०९६ किलो माल नष्ट

आतापर्यंत ५५.७२ कोटी रुपयांचा एकूण २८,६६,०९६ किलो माल नष्ट करण्यात आला. दुग्धजन्य पदार्थांच्या कारवायांमध्ये 487 आस्थापनांची तपासणी करण्यात आली आहे. तर 218 सुधारणा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. 33 जणांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. एकूण 11 एफआयआर दाखल झाल्याची माहिती देखील मुंढे यांनी दिली. आतापर्यंत 55.72 कोटी रुपयांचा एकूण 28, 66, 096 किलो माल नष्ट करण्यात आला आहे. 890 हॉटेलची तपासणी केली आहे. 329 सुधारणा नोटीस बजावल्या आहेत. 116 परवाने निलंबित करण्यात आल्याची माहिती मुंढे यांनी दिली आहे. 25 मे पासून 31 जुलैपर्यंत राज्यात 3137 आस्थापनाची तपासणी केली आहे. सुधारणा नोटीस 764 परवाना निलंबन 165 झाले आहे.



## बापाचा अंत, लेकींना वेळ नाही

■ चंदिगढ (दै. संध्या)

लेकींना अखेरचं पाहावं आणि जीव सोडावा, अशी वडिलांची इच्छा होती. पण अभागी बापाची ती इच्छा पूर्ण झाली नाहीच. इतकंच काय लेकी बापाच्या अंत्यविधीलादेखील आल्या नाहीत. जन्मदात्या पित्याचं अखेरचं दर्शन घेण्यासही त्यांच्याकडे वेळ नव्हता. एकेकाळचे प्रसिद्ध व्यापारी असलेल्या शिवचरण रतन गुप्ता यांनी वृद्धाश्रमात अखेरचा श्वास घेतला. त्यावेळी कुटुंबातील कोणीही त्यांच्या जवळ नव्हतं. जवळपास दीड वर्षांपूर्वी शिवचरण गुप्ता त्यांची पत्नी मीनासह हरियाणाच्या सोनीपतमधील वृद्धाश्रमात राहण्यास आले. त्यांना मुलगा नव्हता. तीन मुली होत्या. लेकींसाठी त्यांनी सगळं केलं. त्या शिकून यशस्वी झाल्या. गुप्ता यांच्या दोन लेकी सरकारी शिक्षिका आहेत. गुप्ता यांच्या निधनाची माहिती तिन्ही लेकींना देण्यात आली. पण त्यांच्या अंत्यसंस्काराला एकही मुलगी पोहोचली. ५१०० रुपये पाठवतोय, अंत्यसंस्कार करून घ्या, अशा सूचना त्यांनी वृद्धाश्रमातील कर्मचाऱ्यांना दिल्या. वडिलांचे अंत्यविधी त्यांनी व्हिडीओ कॉलवरुन पाहिले. जन्मदात्याच्या अस्थी घेण्यासही त्या आल्या नाहीत. शिवचरण गुप्ता यांच्या पत्नीचं आधीच निधन झालेलं आहे. वृद्धाश्रमाचे संचालक आनंद यांनी गुप्ता यांच्या आजारपणाची कल्पना त्यांच्या लेकींना (अनिता, निशा आणि प्रिया) दिली होती. पण कामात असल्याचं कारण देऊन एकही मुलगी वृद्धाश्रमाकडे फिरकली नाही. 'शिवचरण यांच्याकडे एक फोन होता. लेकींशी संवाद साधण्यासाठी त्यांना फोन घेतला होता.

## संपादकीय


# चमक गमावूनही ‘बीए’ तेजीत !

साठ वा सत्तरच्या दशकांतील अनेक हिंदी चित्रपटांत नायकाच्या तोंडी असलेले हे वाक्य; त्यावेळी ‘बीए’च्या पदवीला असलेले महत्त्व अधोरेखित करणारे. देशात उच्च शिक्षणाची व्याप्ती वाढू लागल्यानंतर, वाणिज्य आणि विज्ञान शाखांची महाविद्यालये वाढल्यानंतर आणि व्यावसायिक शिक्षणाच्या विस्तारानंतर ‘बीए’चे वजन कमी झाले. इंजिनीअरिंग, मेडिकल यांसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदव्यांच्या चकचकाटात ‘बीए’ची चमकही फिकी पडत गेली. आता तर सर्वच पदव्या फिक्या वाटत असून, ‘एमएस्सी’, ‘एमई/एमटेक’, ‘एमबीए’, ‘एमडी/एमएस’ या पदव्युत्तर पदव्या वजनदार झाल्या आहेत. तरीही आजही देशात सर्वाधिक पदवी प्रवेश ‘बीए’साठीच होतात आणि नवपदवीधरांतही स्वाभाविकपणे ‘बीए’ झालेल्यांची संख्या सर्वाधिक असते. हे वास्तव अधोरेखित केले आहे, ते देशातील उच्च शिक्षणाचे चित्र स्पष्ट करणाऱ्या ‘एआयएसएचई’ या अहवालाने. या अहवालानुसार, २०२३-२४मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या होती, साडेचार कोटी; त्यांपैकी कला पदवी शाखेला म्हणजेच ‘बीए’ला प्रवेश घेणाऱ्यांची संख्या होती, १.३ कोटी अन् एकूण पदवी प्रवेशातील त्यांचा वाटा होता, ३८.६ टक्के. ‘बीए’च्या खालोखाल ‘बीएस्सी’ला प्रवेश (५३.४ लाख, १५.७ टक्के) घेणारे होते. त्यानंतर ‘बीई/बीटेक’ (४३.२ लाख, १२.७ टक्के), ‘बीकॉम’ (४०.८ लाख, १२ टक्के) असा क्रम लागतो. २०२३-२४मध्ये एक कोटी दहा लाख विद्यार्थी पदवी वा पदव्युत्तर पदवी घेऊन बाहेर पडले. त्यांपैकी २४.४ लाख विद्यार्थ्यांनी ‘बीए’ पदवी मिळवली. ‘बीएस्सी’ झालेल्यांची संख्या ‘बीए’धारकांच्या निम्म्याहून कमी म्हणजे ११.५१ लाख होती. ‘बीकॉम’ झालेले होते, ९.६ लाख आणि ‘बीई/बीटेक’ झालेले होते ८.२ लाख. इंजिनीअर किंवा डॉक्टर होण्याप्रमाणेच भारतीय प्रशासन



सेवेत जाण्याचे किंवा पोलिस अधिकारी होण्याचे किंवा ‘अ’ वर्ग अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणारे कमी नाहीत. या स्वप्नपूर्तीसाठी द्याव्या लागणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांची स्पष्ट कल्पना असणाऱ्यांचा कल ‘बीए’कडे असतो; कारण त्यासाठी अभ्यास करताना स्पर्धा परीक्षांची तयारीही करता येते. अर्थात, गेल्या काही वर्षांपासून ‘बीई/बीटेक’ वा ‘एमबीबीएस’ झालेलेही स्पर्धा परीक्षा देत असून, यशस्वी होणाऱ्यांतील त्यांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षा देऊ इच्छिणारे सर्वच जण ‘बीए’ला प्रवेश घेतात, असे थेट विधान करता येत नाही. भाषा, साहित्य किंवा समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान आदींबद्दल रुची असणाऱ्यांनी ही शाखा निवडणे स्वाभाविक. फार त्रास न होता पदवी शिक्षण पूर्ण करू इच्छिणारे किंवा एक पदवी घेऊन मोकळे होऊ इच्छिणारेही कला शाखेकडे वळतात; त्यांपैकी काहींना अन्य शाखांत रस नसतो, तर काहींना काम करीत शिक्षण घ्यायचे असते. ‘बीए’ला प्रवेश घेणाऱ्यांत आणखी एक वर्ग आहे; तो म्हणजे उच्च व्यावसायिक शिक्षण न परवडणारा. खासगी व्यावसायिक शिक्षणासाठीचे काही लाखांत जाणारे शुल्क भरू न शकणारेही अकरावीपासूनच कला शाखेकडे वळतात. मात्र, सर्वाधिक विद्यार्थ्यांची पसंती असलेल्या या शाखेला आपल्याकडे दुय्यम मानले जाते. वास्तविक, अन्य शाखांइतकीच ही शाखाही महत्त्वाची आहे. देशाला शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञांप्रमाणेच समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, तत्त्वज्ञ, भाषातज्ज्ञ, साहित्य समीक्षकही आवश्यक असतात. सामाजिक ताणतणाव, स्त्री-पुरुष समानतेपासून वंचित घटकांच्या उन्नतीसाठीच्या चळवळी, बदलते अर्थकारण, साहित्यातील विविध प्रवाह या साऱ्यांचा अभ्यास समाताधिष्ठित समाजासाठी महत्त्वाचा असतो. त्यामुळे या शाखेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची, तेथील शिक्षण पद्धतीत बदल करण्याची आणि या शाखेसाठी गुंतवणूक वाढविण्याची गरज आहे. तरच या शाखेचे शिक्षण आणखी दर्जेदार होईल; आणि ‘बीए’धारकांची उपेक्षा थांबेल.

## गुरु वचन



### भक्ती मार्ग सर्वोत्कृष्ट – आचार्य दिव्यचेतनानंद

विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे तीन मार्ग आहेत – ज्ञान, कर्म व भक्ती. वास्तवात हेच ज्ञान आहे, ज्याद्वारे आपण ईश्वर कोण आहे? हे जाणतो. ज्ञान आपल्या मेंदूत साठवले जाते व याद्वारेच आपण ईश्वर प्राप्त करतो. मानवाचा मेंदु छोटा असतो, मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसे जाणतो? हा प्रश्न निर्माण होतो. खरंतर मेंदूत असलेल्या ज्ञानातूनच हे शक्य होते. ज्ञानामुळे मन सुद्धा तृप्त होते. श्रीआनंदमूर्ती यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव असते तोपर्यंत त्याने ज्ञानार्जन करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर तुमच्या ज्ञान ग्रहण करण्याची भूख मिटते कारण तोपर्यंत तुमचे ध्येय ईश्वराला प्राप्त करणे असते.

काही विद्वानांनुसार, कर्मातूनच ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मानव एक क्षण जिवंत राहू शकत नाही म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत श्रीकृष्णाने मानवास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे धार्मिक व अध्यात्मिक जगतात जेवढी ज्ञानाला किंमत असते, तेवढीच कर्माची असते. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ मनाने ईश्वराची भक्ती केल्यास ईश्वर प्राप्ती अवघड नाही. खरंतर भक्तीच एकमेव मार्ग आहे, ज्यावर मोठ–मोठ्या ज्ञानींनी वाटचाल केली आहे. आपण सर्व मानतो की, संपूर्ण चराचराची निर्मिती ईश्वरानेच केली आहे.

म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचीच संतान आहे. जर तुम्ही परमात्म्यास प्रसन्न करु इच्छित असाल तर प्रत्येक जीवाप्रती प्रेम–भाव बाळगा. यासाठी तुम्हाला मानव सेवा, समाज सेवा आणि निराधारांना आधार दिला पाहिजे. मानव सेवा करताना नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. वास्तवात हीच भक्ती आहे. यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव जागृत झाला तर तुम्हाला ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. १०३२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 8 | | 6 | 3 | 5 | | |
| | | 9 | | | | | | |
| 4 | | | | 2 | 7 | 9 | 1 | |
| | | 6 | 5 | 7 | 4 | 1 | | 2 |
| | | 2 | | | | 4 | | |
| 3 | | 7 | 2 | 1 | 9 | 6 | | |
| | 9 | 4 | 7 | 8 | | | | 1 |
| | | | | | | 7 | | |
| | | 1 | 3 | 4 | | 8 | 5 | |

**: सूडोकु :**

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०३१ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6 | 2 | 5 | 7 | 3 | 4 | 9 | 8 |
| 4 | 9 | 7 | 2 | 6 | 8 | 3 | 1 | 5 |
| 5 | 8 | 3 | 1 | 4 | 9 | 6 | 2 | 7 |
| 2 | 1 | 9 | 6 | 8 | 7 | 5 | 4 | 3 |
| 6 | 5 | 8 | 4 | 3 | 2 | 1 | 7 | 9 |
| 3 | 7 | 4 | 9 | 1 | 5 | 8 | 6 | 2 |
| 8 | 4 | 5 | 7 | 9 | 1 | 2 | 3 | 6 |
| 7 | 2 | 1 | 3 | 5 | 6 | 9 | 8 | 4 |
| 9 | 3 | 6 | 8 | 2 | 4 | 7 | 5 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७६२ – पत्ते खेळताना वेळ जाऊ नये म्हणून अर्ल ऑफ सँडविचने ब्रेडच्या दोन स्लाईसमध्ये मांसाचे तुकडे घालून खाल्ले. या प्रकाराला पुढे ’सँडविच’ म्हणण्यात येऊ लागले.
- १९२६ – एरंडले या महिलेने महिलांमध्ये सर्वप्रथम इंग्लिश खाडी पोहून जाण्याचा मान मिळवला.
- १९४५ – अमेरिकेने जपानमधील ‘हिरोशिमा’ या शहरावर अणुबॉम्ब टाकून संपूर्ण शहर बेचिराख केले.
- १९५१ – मनचुरीयामध्ये पुरात ४,८०० ठार.

### राष्ट्रीय

- १९४८ – औरंगाबाद आणि नजीकच्या ८३ खेड्यांनी निजामाची सत्ता झुगारून दिली.
- १९८३ – अणुशक्ती मंडळाच्या अध्यक्षपदी राजा रामण्णा यांची निवड.
- १९८६ – पहिल्या भारतीय टेस्टट्यूब बेबीचा मुंबईत जन्म.


### जन्म

- १६९७ – चार्लेस सातवा, रोमन राजा.
- १८८१ – सर अॅलेक्झांडर फ्लेमिंगो, पेनिसिलिन या औषधाचा शोध लावणारा ब्रिटिश संशोधक.
- १९२५ – बारबरा बेट्स, हॉलीवुड अभिनेत्री.

### निधन

- १६२३ – अॅन हॅथवे, शेक्सपिअरची पत्नी.
- १८६७ – फौसटीन, हयातीचा राजा.
- १९०१ – कृष्णाशास्त्री राजवाडे, ग्रंथकार.
- १९२५ – सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बंगालमधील प्रसिद्ध राजकारणी, जहाल गटाचे नेते.
- १९६५ – वसंत पवार, संगीत दिग्दर्शक.
- १९७८ – पोप पॉल सहावा.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. १०३२



**आडवे शब्द**

१. संवर्धन, वाढवणे
४. एकत्र वास्तव्य
७. उगवत्या सूर्याचा देश
१०. चंद्रकळेवर असल्यास पांढरी रसत्यावर असल्यास काळी
११. पाट लावल्यास कापडाचा स्वस्तातील प्रकार
१३. जयंती
१६. जिभेचा नखरा
१७. हेतू, स्वार्थ
१८. ’चालणाऱ्याचे भाग्य चालते’ या संस्कृत वचनात आढळणारे नशीब
१९. लोचन
२०. हात
२१. शहर
२२. सिद्धता
२३. नाकारार्थी उद्गार
२४. चेहरा, मुख
२६. सुगरणीच्या पोळीला तीन असतात, चिरोट्याला अनेक
२८. बाजू (उचलून धरणे)
२९. थंड, गार
३०. प्रयत्न, खटपट
३२. या वर्षी
३३. दारूचा एक प्रकार
३५. नवरा, आमंत्रक
३७. हिमालयकन्या
३९. स्तोत्र, स्तुतीचे गीत
४०. पालिकेतील लोकप्रतिनिधी
४२. अकस्मात, अनपेक्षितरीत्या
४४. श्रेष्ठ पुरुष
४६. हुबेहूब सोंग वठणारा
४८. उसना रूबाब
४९. हिच्यामागे कधीही ’कु’ प्रत्यय लागू शकत नाही असे ’रामायण’कारांचे वचन आहे
५०. अनेक कप्प्यांची छोटी पिशवी
५२. सगळ्या मानवजातीच्या रक्ताचा रंग
५३. असा उपदेश काय कामाचा!
५४. कर्णाची आई पण जननी नव्हे
५५. निष्णात, वाक्बगार
५७. महाराष्ट्रातील इतिहासकालीन प्रसिद्ध घराणे
६०. माया, जिव्हाळा
६२. जिंकलेला
६३. दिवस (संस्कृत)
६४. सापाची एक विषारी जात
६६. कोवळी फांदी
६७. ’आ’काराची उभी रेघ
६८. स्त्री भूत?
६९. धुणे, स्वच्छ करणे
७१. चांगले वर्तन
७२. चंद्राची कड
७३. वाळवी, न्यूनता, उणीव
७५. नमस्कारासाठी आवश्यक गोष्ट?
७६. वाद्य वाजविणारा
७७. विजार
७८. चप्पल, बूट इ.
७९. संगणक आला तरी शिक्कामोर्तबासाठी ही हवीच!
८०. रोटीचा मऊमुलायम प्रकार

**उभे शब्द**

१. जबाबदारीचे ओझे (ला.)
२. कालवड
३. नवी ओळख
४. लिंबाचे पेय
५. जागरूक
६. इंद्रिय
८. पचनाला सहाय्यक
९. नऊ भावना
१२. पाणी
१४. दिवस
१५. नियमानुसार, वैध मार्गाने
१७. सुसर
२१. मोठी नदी
२५. नम्रतेने मान खाली घालणे
२६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
२७. विहीर, अळीकडे
२८अ. नालस्ती
३०. मेंढपाळ
३१. सर्दी
३४. दुसऱ्याच्या मनातील भाव जाणणारा
३६. माणूसकी
३७. स्वयंपाकाचे कसब
३८. ’नटरंग’मध्ये अतुल कुलकर्णीने साकारलेली भूमिका
४१. अरण्य, जंगल
४२. वनवास
४३. व्यापारी फायदा
४५. मुंबईजवळच्या प्रसिद्ध वृद्धाश्रमाचे नाव
४७. लोभ, तीव्र इच्छा
४८. कोंबड्याचे ओरडणे
५०. पंजातील पहिले बोट
५१. लाकडाची एक उत्कृष्ट जात
५४. श्रीरामाचे स्तोत्रकवच
५६. तेजस्वी, प्रफुल्लित
५८. तरतरीत, ताजा –––
५९. शिव! शिव!
६१. मारणे, चोपणे
६४. मळखाऊ
६५. तीव्र ऊन
६७. कृती, अंमलबजावणी
७०. कायदेशीर मध्यस्थ
७१. समारंभपूर्वक सन्मान
७२. शेळीचे पिल्लू
७४. एकोपा, मैत्री
७५. शरीरयष्टी
७७. अष्टविनायकांपैकी एक कोकणातील स्थान

**जम्बो शब्दकोडे क्र. १०३१ चे उत्तर**

आडवे उत्तर : १. अपराध ६. अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

उभे उत्तर : १.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ. टाकोटाक ७०.मनवा ७२. मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस


## उपदेशकथा

### स्थितप्रज्ञ

स्थितप्रज्ञ व्यक्ती, समदर्शी व्यक्ती, ‘पोचलेला’ माणूस असे शब्द आपण नेहमी ऐकतो. त्याची ही काही उदाहरणे– गाडगे महाराजांसारखा सत्पुरुष हरिकीर्तनात दंग असताना मुलगा दगावल्याची तार आल्याचे कळताच ‘ऐसे गेले कोट्यानुकोटी काय रडू एकासाठी’ म्हणत कीर्तनरंग चालू ठेवतो. कोर्टात असहकार आंदोलनातील कार्यकर्त्यांचा खटला चालू असताना बॅ. वल्लभभाई पटेल आपली बाजू मांडत असतात. पत्नी दिवंगत झाल्याची चिठ्ठी हाती येते नि ती चिठ्ठी बाजूला ठेवून ते आपले कर्तव्य पुरे करतात नि मगच घरी जातात. आदी शंकराचार्य मातुश्रींना दिलेल्या वचनानुसार केरळमधील कालडी या आपल्या गावी तिला भेटायला जातात. पुत्र भेटावा या इच्छेने तिने पंचप्राण डोळ्यात आणून साठवलेले. तो भेटला या समाधानाने ती आई नश्वर जगाचा निरोप घेते. गावचे ब्राह्मण अग्नीसंस्कारासाठी येत नाहीत. ‘निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधि: को निषेध:’ अशी चित्तसमता साधलेले आचार्य त्या देहाचे तीन भाग करतात नि एकेक करून नदीकाठी वाहून नेतात.

कथा उपदेश : जीवनभर साधना करूनही पुष्कळांना समदर्शिता साधता आली नाही तर काही मोजक्या व्यक्तींना ती जणू उपजतच लाभलेली आढळते.

## : SMS :



Exam me: Paper dekh ke bola "Ye sawaal bahar se aaya hai"
Dost: Kaise?
"Kyunki teacher ne andar padhaya hi nahi tha"

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.४ | २४.१ |
| अहमदनगर | २९.४ | २२.२ |
| अकोला | ३७.४ | २५.२ |
| अमरावती | ३७ | २५.३ |
| बीड | ३९.३ | २६ |
| भंडारा | ३९.१ | २६.८ |
| बुलढाणा | ३५.७ | २६.९ |
| चंद्रपूर | ३९ | २६.७ |
| चेन्नई | ४१ | ३०.२ |
| नवी दिल्ली | ३८.५ | ३४.१ |
| धुळे | ३५.५ | २४.९ |
| गोंदिया | ३८.६ | २६.५ |
| जळगाव | ३६.७ | २४.९ |
| कोल्हापूर | २९.३ | २१.८ |
| लातूर | ३१.८ | २२.८ |
| मुंबई | ३३.४ | ३०.३ |
| नागपूर | ३८.८ | २५.७ |
| नांदेड | ३४.९ | २४.९ |
| नंदूरबार | ३१.४ | २५ |
| नाशिक | २९ | २२.६ |
| पुणे | २६.६ | २२.३ |
| पंढरपूर | ३३.७ | २४.५ |
| सातारा | २९.८ | २१ |
| सांगली | ३१.६ | २२.६ |
| सोलापूर | ३३.५ | २४.५ |
| वर्धा | ३८.५ | २५.६ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पूर्व
वेळेत काम पूर्ण न झाल्यामुळे निराश रहाल. आपल्या कामाचे कौतुक होईल.

**तुळ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व
कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. बुद्धी चातुर्यामुळे आर्थिक स्थितीत वृद्धी होईल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम
कामकाजात सावधानी बाळगा. वातावरण अनकूल जरी असले तरी आपले काम पूर्ण हेणार नाही.

**वृश्चिक :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण
कौटुंबिक प्रगती होईल. थोडे प्रयत्न केल्याने फायद्याचे मार्ग मोकले होतील.

**मिथुन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
प्रयत्न केले तर अवघड कामातही यश मिळेल. लांबच्या मित्राची गाठ होईल. लाभामुळे आनंदी रहाल.

**धनु :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
प्रयत्न व दूरदर्शिपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल.

**कर्क :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम
श्रमाच्या कामात यश मिळेल. नवीन संबंध भविष्यात फायदेशीर असतील. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मकर :** शुभ रंग: जांभळा : शुभ दिशा: पूर्व
व्यापार, व्यवसायात जबाबदारीने व्यवहार करा. वडिलधाऱ्या लोकांशी वाद होण्याची शक्यता आहे.

**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
नौकरीत अधिकारी वर्गाकडून सहकार्य लाभेल. काही नवीन योजना आखाल.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व
व्यवहारात स्पष्टपणा दाखवा. प्रवास शक्यतो आज टाळा. मानसिक त्रास राहणार आहे. कामकाजात मन लागणार नाही.

**कन्या :** शुभ रंग:केसरी,शुभ दिशा:पूर्व
विचार पूर्वक कामे केले तर फायदा होऊन आपली प्रशंसा होईल. व्यापारात प्रतिस्पर्ध्यावर मात कराल.

**मीन :** शुभ रंग :केसरी, शुभ दिशा: पश्चिम
सामाजिक कार्यात सक्रीय रहाल. आशा आकांक्षा पूर्ण होतील. आपल्या प्रयत्नांनी घरगुती समस्या दूर होतील.

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:भरणी २०:१३:२१ |
| ६ ऑगस्ट २०२६ | योग:गण्ड १५:००:१५ |
| गुरुवार | करण:बालव ०७:५१:१४ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव १८:५२:५७ |
| श्रावणशके संवत्– १९४८ | करण:तैतिल |
| संवत्सर –पराभवनाम | २९:४८:०८+ |
| अयन– दक्षिणयन | सूर्य:कर्क |
| मास– आषाढ | चन्द्र:मेष |
| ऋतु– सौर वर्षा | हिजरी सन् – १४४८ |
| कृष्ण पक्ष | मुस्लिम मास – सफर |
| तिथि:अष्टमी १८:५२:५७ | तारीख – २२ |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### मंगेश लोहोर यांची सुवर्णकामगिरी; 'हेअर ट्रान्सफॉर्मर २०२६'चे विजेतेपद

**पुणे : दैनिक संध्या**

पुण्यातील 'फ्लाइंग सिझर युनिसेक्स सलून अँड अकॅडमी'चे संचालक आणि आंतरराष्ट्रीय हेअर स्टायलिस्ट मंगेश (यश) लोहोर यांनी थायलंडमधील बँकॉक येथे आयोजित प्रतिष्ठित 'मॅट्रिक्स प्रो – हेअर ट्रान्सफॉर्मर २०२६' स्पर्धेत विजेतेपद पटकावत पुण्यासह भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. 'एमएचटी मेन्स कलर अँड कट २०२६' प्रकारातील या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतातील हजारो हेअर स्टायलिस्टनी सहभाग घेतला होता. उपांत्य फेरीत संपूर्ण पुण्यातून केवळ मंगेश लोहोर यांची निवड झाली होती. त्यानंतर अंतिम फेरीत आधुनिक केशरचना, आकर्षक हेअर कलर ट्रान्सफॉर्मेशन आणि उत्कृष्ट तांत्रिक कौशल्याचे प्रदर्शन करत त्यांनी परीक्षकांची मने जिंकली आणि विजेतेपदावर आपले नाव कोरले. 'मॅट्रिक्स प्रोफेशनल'तर्फे आयोजित या स्पर्धेतील विजेत्यांची निवड आलिम हकीम, सॅम जेम्स, विपुल चुडासमा, मेलरॉय डिक्सन आणि बिनायफर पार्डीवाला या नामांकित परीक्षकांच्या उपस्थितीत करण्यात आली. विशेष म्हणजे, मंगेश लोहोर यांनी यापूर्वी २०२३, २०२४ आणि २०२५ अशा सलग तीन वर्षांत राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विजेतेपद पटकावले आहे. राष्ट्रीय स्तरावरील या सातत्यपूर्ण कामगिरीनंतर आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्यांनी आपल्या कौशल्याची छाप उमटवली आहे. मंगेश लोहोर यांनी २०१७ मध्ये पुण्यातील डेक्कन जिमखाना परिसरात 'फ्लाइंग सिझर युनिसेक्स सलून अँड अकॅडमी'ची स्थापना केली. अत्याधुनिक प्रशिक्षण, उद्योगाच्या गरजांशी सुसंगत अभ्यासक्रम आणि गुणवत्तापूर्ण सेवेमुळे अकॅडमीने या क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. येथे प्रशिक्षण घेतलेले शेकडो विद्यार्थी आज देशातील नामांकित सलूनमध्ये तसेच स्वतःच्या व्यवसायाच्या माध्यमातून कार्यरत आहेत. आपल्या आंतरराष्ट्रीय यशाबद्दल मंगेश (यश) लोहोर यांनी मॅट्रिक्स टीम, मार्गदर्शक, कुटुंबीय, सहकारी, विद्यार्थी आणि ग्राहकांचे आभार मानले. "हे यश माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे आहे. भविष्यातही भारतीय हेअर इंडस्ट्रीचे नाव जागतिक स्तरावर अधिक उंचावण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करत राहीन," अशी भावना मंगेश लोहोर यांनी व्यक्त केली.

### विद्यार्थ्यांचे आधार बायोमेट्रिक अद्ययावत करण्यासाठी विशेष मोहीम

**पुणे : दैनिक संध्या**

जिल्ह्यातील शाळांमधील ५ ते १५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचे आधार बायोमेट्रिक अद्ययावत करण्यासाठी ३ ते १८ ऑगस्ट या कालावधीत राज्यस्तरावरून जिल्ह्यातील शाळांमध्ये विशेष मोहीम आयोजित करण्यात आली आहे. भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण यांच्याकडील माहितीनुसार जिल्ह्यातील ८ हजार ५३४ शाळांमधील ५ ते १५ वर्षे वयोगटातील एकूण ३ लाख २४ हजार २७ विद्यार्थ्यांचे आधार बायोमेट्रीक (MBU) अद्ययावत करणे प्रलंबित आहे. या मोहिमेअंतर्गत शाळांमध्ये आधार शिबिरांचे आयोजन करणेत आलेले आहे. यावेळी ज्या विद्यार्थ्यांचे आधार बायोमेट्रीक अद्ययावतीकरण प्रलंबित आहे अशा विद्यार्थ्यांच्या पालकांना शाळा प्रशासनांनी पूर्वसूचना देऊन विद्यार्थ्यांची उपस्थिती सुनिश्चित करावी, असे आवाहन आधार समन्वय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी पल्लवी घाडगे यांनी केले आहे.

### सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसमुळे तरुणींना कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात करिअरची नवी संधी

**पुणे : दैनिक संध्या**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचा झपाट्याने विस्तार होत असताना या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या महाराष्ट्रातील तरुणींना व्यावहारिक तंत्रज्ञान कौशल्ये आणि प्रत्यक्ष प्रकल्पांचा अनुभव देण्यासाठी 'सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस' महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील एक हजारांहून अधिक तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले असून, देशभरात आतापर्यंत २६ हजार ५०० हून अधिक युवक-युवतींना प्रशिक्षण मिळाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे विविध उद्योगांमधील कामाचे स्वरूप बदलत असून नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे या क्षेत्रासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार करण्याबरोबरच तरुण महिलांना तंत्रज्ञान क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी सक्षम करण्यावर सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसच्या माध्यमातून भर दिला जात आहे. उद्योगांच्या गरजांशी सुसंगत कौशल्ये, प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण आणि वास्तविक प्रकल्पांवर काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमातून दिली जाते. नवी मुंबईतील रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची विद्यार्थिनी हिमांशी शर्मा हिच्यासाठी हा कार्यक्रम शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता उद्योगातील प्रत्यक्ष काम यांच्यातील महत्त्वाचा दुवा ठरला. कार्यक्रमातील प्रशिक्षण आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून तिने 'करिअरस्टॅक एआय' ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित रेझ्युमे विश्लेषण प्रणाली विकसित केली. नोकरी शोधणाऱ्या उमेदवारांना त्यांचे अर्ज अधिक प्रभावी करण्यासाठी ही प्रणाली मदत करते. या अनुभवानंतर हिमांशीला अमेरिकेतील 'ब्लू सॅफायर' कंपनीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा तंत्रज्ञान प्रशिक्षणार्थी म्हणून संधी मिळाली. येथे ती ग्राहक-केंद्रित तसेच पेटंटसाठी अर्ज करण्यात आलेल्या प्रकल्पांमध्ये योगदान देत आहे.

# म्हाडाच्या प्रलंबित गृहनिर्माण प्रकल्पांना तातडीने गती द्या

## सर्वसामान्यांसाठी मोठी घरांची लॉटरी लवकर जाहीर करा : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) स्तरावरील सर्व प्रलंबित प्रस्ताव तातडीने मार्गी लावावेत. शासन स्तरावरील आवश्यक प्रशासकीय मान्यता आणि निर्णय प्रक्रियेलाही गती देऊन सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे आज झालेल्या बैठकीत पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांचा आणि धोरणात्मक विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी,



सांगली जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष हे दूरदृश्य प्रणालीद्वारे, तसेच म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे आणि पुणे म्हाडाचे मुख्याधिकारी राहुल साकोरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शिरूर (पुणे) येथील १५५.२२ कोटी रुपयांच्या आणि खराबवाडी (पुणे) येथील ८९.४७ कोटी रुपयांच्या म्हाडा गृहनिर्माण प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. पुणे मंडळाच्या २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील लाभार्थ्यांकडून विकासकांकडून आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त शुल्काच्या तक्रारी गांभीर्याने घेऊन नागरिकांची आर्थिक पिळवणूक होणार नाही, यासाठी स्पष्ट धोरण तयार करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले. तसेच, यूडीसीपीआरच्या तरतुदीनुसार विक्रीअभावी रिक्त असलेल्या सदनिकांचे सहा महिन्यांच्या आत वितरण करण्याबाबत स्पष्ट निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून शासन आणि विकासकांचे आर्थिक नुकसान टळेल. याशिवाय खराडी येथील म्हाडाच्या भूखंडावरील पोस्ट विभागाचे आरक्षण रद्द करून पर्यायी जागा उपलब्ध करून देणे, दापोडी (पुणे) येथे सुमारे ८ ते १० हजार घरांचा गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लावणे, तसेच म्हाळुंगे-इंगळे येथील प्रकल्पासाठी पीएमआरडीएकडून १८ मीटर रुंदीचा रस्ता, पाणीपुरवठा व एसटीपीची कामे तातडीने पूर्ण करणे, अशा विविध विषयांबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश देण्यात आले.

> उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी म्हाडाची मोठी घरांची लॉटरी लवकरात लवकर जाहीर करावी आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावी. दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा लॉटरीत प्रतिसाद न मिळालेल्या सदनिकांची 'फर्स्ट कम, फर्स्ट सर्व्ह' तत्त्वावर तातडीने विक्री करावी, जेणेकरून रिक्त घरे पडून राहणार नाहीत आणि इच्छुक नागरिकांना त्वरित घरे उपलब्ध होतील, असे निर्देशही त्यांनी दिले. विद्यार्थी तसेच नोकरीसाठी स्थलांतरित होणाऱ्या महिलांच्या गरजा लक्षात घेऊन वर्किंग वुमन हॉस्टेल आणि विद्यार्थी वसतिगृहे भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याचा उपक्रम म्हाडामार्फत राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मिरज (सांगली) येथील दोन हेक्टर जमीन म्हाडाकडे हस्तांतरित करण्याबरोबरच सांगली शहरातील मोक्याच्या शासकीय जागा म्हाडाला उपलब्ध करून त्या ठिकाणी परवडणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांचा विकास करावा, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी स्पष्ट केले. बैठकीच्या शेवटी त्यांनी सर्व प्रकल्पांसाठी निश्चित कालबद्ध कृती आराखडा तयार करून प्रत्येक प्रस्तावाच्या प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## १९ ऑगस्टपासून 'इंडियन डीजे एक्स्पो-२०२६'

### ५०० हून अधिक जागतिक ब्रँड्सचा सहभाग

■ पुणे (दै. संध्या)

मनोरंजन तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतातील प्रतिष्ठित आणि बहुप्रतिक्षित 'इंडियन डीजे एक्स्पो-२०२६'चे आयोजन १९ ते २१ ऑगस्ट २०२६ दरम्यान भारत मंडपम, प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनाची ही ११ वी आवृत्ती असून, व्यावसायिक ध्वनी प्रणाली, प्रकाशयोजना, दृकश्राव्य तंत्रज्ञान, वाद्ये, डीजे तंत्रज्ञान, एलईडी डिस्प्ले आणि विशेष दृश्य-ध्वनी प्रभाव क्षेत्रातील देशातील प्रमुख व्यावसायिक व्यासपीठ म्हणून या प्रदर्शनाची ओळख निर्माण झाली आहे. यंदाच्या प्रदर्शनात ५०० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आघाडीचे ब्रँड्स सहभागी होण्याची अपेक्षा आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण उत्पादने आणि भविष्याभिमुख तांत्रिक उपायांच्या माध्यमातून भारतातील मनोरंजन आणि सिस्टिम इंटिग्रेशन उद्योगात वेगाने होत असलेल्या बदलांची झलक या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे. यंदा 'प्रो एव्ही सिस्टिम्स इंटिग्रेशन एक्स्पो-२०२६'चेही याच ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. वाढत्या इन्स्टॉलेशन आणि सिस्टिम इंटिग्रेशन बाजारपेठेवर यामध्ये विशेष भर दिला जाणार आहे. कमर्शियल ऑडिओ, इन्स्टॉल्ड साउंड, साउंड रिइन्फोर्समेंट, कॉन्फरन्सिंग प्रणाली, डिजिटल सायनेज, एलईडी डिस्प्ले तंत्रज्ञान आणि इंटेलिजंट लाइटिंगसह विविध अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे सादरीकरण येथे होणार आहे.

> ■ व्यावसायिक ध्वनी, प्रकाशयोजना, दृकश्राव्य प्रणालींसह अत्याधुनिक मनोरंजन तंत्रज्ञानाची तीन दिवसीय मेजवानी

## 'एकपात्री महोत्सवा'तून अभिनय कलेच्या विविध पैलूंचा वेध

### सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे ७ व ८ ऑगस्ट रोजी पुणे येथे परिसंवाद व मार्गदर्शन सत्रांचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने 'एकपात्री महोत्सवा'चे आयोजन शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट आणि शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी भरतमुनी रंगघन, चिंतामणी मंदिराजवळ, सेक्टर क्र. २४, निगडी प्राधिकरण, पुणे येथे करण्यात आले आहे. 'पात्र एक... पण मुखवटे अनेक!' या संकल्पनेवर आधारित या महोत्सवात एकपात्री अभिनय कलेचे विविध पैलू उलगडणारे परिसंवाद आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमास सर्व रसिकांसाठी विनामूल्य प्रवेश आहे. एकपात्री अभिनय ही रंगभूमीवरील अत्यंत आव्हानात्मक आणि प्रभावी कलाविष्काराची परंपरा आहे. एकाच कलाकाराच्या अभिनय, वाचिक अभिव्यक्ती, देहबोली, भावविश्व




आणि सर्जनशीलतेच्या माध्यमातून अनेक व्यक्तिरेखा आणि विविध भावछटा साकारण्याची क्षमता या कलाप्रकारात अनुभवता येते. या कलेचा अभ्यास, संवर्धन आणि नवोदित कलाकारांना मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी, शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी दुपारी ५.०० ते रात्री ८.०० या वेळेत आयोजित परिसंवाद व मार्गदर्शन सत्रात मकरंद टिल्लू, प्रकाश पारखी, राहुल भालेराव, प्रचिती सुरु आणि शारदा मुंढे हे मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत प्रकाश पारखी, दीपक रेगे, अंजली कराडकर आणि चैताली माजगावकर यांचे मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले आहे. या परिसंवादातून एकपात्री अभिनयाची संकल्पना, सादरीकरणाची तंत्रे, व्यक्तिरेखा उभारणी, रंगमंचावरील अभिव्यक्ती, आवाजाचा प्रभावी वापर आणि एकपात्री सादरीकरणातील विविध पैलूंवर सखोल चर्चा होणार आहे. नवोदित कलाकार, नाट्य विद्यार्थी, रंगकर्मी आणि नाट्यप्रेमींसाठी हा महोत्सव अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी ठरणार आहे.

## सूर्या हॉस्पिटलच्या ह्युमन मिल्क बँकेने तीन वर्षांत उभारला दूधदानाचा प्रेरणादायी उपक्रम

■ पुणे (दै. संध्या)

चौदा जानेवारी २०२३ रोजी सुरू झाल्यापासून 'सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पुणे' येथील ह्युमन मिल्क बँकेने १,१७६ दात्या मातांकडून एकूण १,२०३ लिटर ५३१ मिलिलिटर मातृदूध संकलित केले असून, त्याचा लाभ १,४६४ नवजात बालकांना झाला आहे. ६० लिटर क्षमतेची ही 'मिल्क बँक' नवजात अतिदक्षता विभाग (एनआयसीयू), प्रसूती कक्ष, प्रसूतीनंतरचे वॉर्ड आणि प्रसूती सेवा विभागाशी जोडलेली आहे. त्यामुळे नवजात तज्ज्ञ आणि स्तनपान सल्लागारांची टीम वैद्यकीय गरजेनुसार दात्या मातांचे दूध बालकांना उपलब्ध करून देते. या प्रत्येक आकड्यामागे आपल्या अतिरिक्त मातृदुधाचे दान करणारी एक आई आणि जीवनाच्या अत्यंत नाजूक टप्प्यावर त्या दुधाची गरज असलेले एक नवजात बाळ आहे. दात्या मातांचे दूध विशिष्ट वैद्यकीय परिस्थितींमध्ये वापरले जाते. उदाहरणार्थ, प्रसूतिनंतर आईची प्रकृती सुधारत असताना, अकाली किंवा गुंतागुंतीच्या



प्रसूतीनंतर दूध उशिरा येत असल्यास, आई आजारी असल्यास, 'एनआयसीयू'मुळे आई-बाळ काही काळ वेगळे असल्यास किंवा प्रसूतिनंतरच्या सुरुवातीच्या दिवसांत पुरेसे दूध तयार होत नसल्यास अशा वेळी दात्या मातांचे दूध उपयुक्त ठरते. भारतातील ह्युमन मिल्क बँकिंगच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, नवजात बालकासाठी आईचे स्वतःचे दूध हा सर्वोत्तम आहार आहे. मात्र, ते उपलब्ध नसल्यास किंवा अपुरे असल्यास पाश्चराइज्ड दात्या मातांचे दूध हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो. वैद्यकीय गरजेनुसार फॉर्म्युला दूधही वापरले जाऊ शकते; परंतु उच्च जोखमीच्या नवजात बालकांसाठी दात्या मातांचे दूध अधिक सुरक्षित मानले जाते. हे दूध नाजूक प्रकृतीच्या बालकांना सहज पचते आणि फॉर्म्युला दुधात नसणारे अनेक संरक्षणात्मक फायदे त्यातून मिळतात.

ही मिल्क बँक अकाली जन्मलेले, कमी वजनाची नवजात बालके, गंभीर आजार असलेली बालके तसेच 'नेक्रोटायझिंग एन्टेरोकॉलायटिस' (एनईसी) या गंभीर आतड्यांच्या आजाराचा धोका असलेल्या बालकांसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. 'एनईसी' हा आजार प्रामुख्याने अकाली किंवा अत्यल्प वजनाच्या बालकांमध्ये आढळतो. यामध्ये आतड्यांना सूज येऊन त्यांचे नुकसान होते. त्यामुळे बाळाला दूध देण्यास अडथळा निर्माण होतो, गंभीर संसर्ग होऊ शकतो आणि काही वेळा शस्त्रक्रियेचीही गरज भासते.

भारतातील अत्यल्प वजनाच्या नवजात बालकांवरील एका निरीक्षणात्मक अभ्यासात असे आढळले, की रुग्णालयात ह्युमन मिल्क बँक सुरू झाल्यानंतर निश्चित आणि प्रगत अवस्थेतील 'एनईसी'चे प्रमाण ९.४ टक्क्यांवरून १.७६ टक्क्यांपर्यंत घटले, तर रुग्णालयातून सुटी मिळताना केवळ मातृदूधावर असलेल्या बालकांचे प्रमाण ३०.२ टक्क्यांवरून ७२.६ टक्क्यांपर्यंत वाढले. या उपक्रमाविषयी बोलताना 'सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पुणे' येथील बालरोग, नवजात शिशुरोग आणि बाल अतिदक्षता विभागाच्या प्रमुख, असोसिएट चीफ आणि वरिष्ठ सल्लागार डॉ. अमिता कौल म्हणाल्या, की 'अकाली किंवा गंभीर आजारी नवजात बालकासाठी आहाराचे नियोजन हे उपचारांइतकेच महत्त्वाचे असते. आईची प्रकृती सुधारत असताना किंवा तिचे दूध पुरेसे तयार होईपर्यंत दात्या मातांचे दूध बाळाला आवश्यक आधार देते. दान करणाऱ्या आईसाठी ते अतिरिक्त दूध असू शकते; पण दुसऱ्या कुटुंबासाठी ते त्यांच्या बाळाच्या उपचारातील अत्यंत महत्त्वाचा भाग ठरू शकते.' लॅक्टेशन कन्सल्टंट डॉ. मनीषा खलाणे म्हणाल्या, की 'अनेक मातांना स्तनपान करायची इच्छा असते; मात्र सुरुवातीच्या काही दिवसांत त्यांना मदतीची गरज असते. आमची भूमिका त्यांच्यावर कोणताही दबाव न आणता योग्य मार्गदर्शन करण्याची आहे. दूध सुरक्षितपणे काढणे, साठवणे आणि अतिरिक्त दूध असलेल्या पात्र मातांना दूधदानासाठी प्रोत्साहित करणे हे आमचे काम आहे. एका आईचे अतिरिक्त दूध दुसऱ्या नवजात बालकासाठी जीवनदायी ठरू शकते.'

> सध्या पुण्यात सूर्या हॉस्पिटलसह सुमारे सात ह्युमन मिल्क बँक कार्यरत आहेत. स्तनपान, सुरक्षित दूधदान आणि प्रसूतीनंतर लवकर स्तनपान सल्ला घेण्याबाबत जनजागृती वाढवण्याचे काम पुढेही सुरू ठेवण्याचा रुग्णालयाचा मानस आहे. अकाली जन्मलेल्या किंवा गंभीर आजारी नवजात बालकांच्या कुटुंबांसाठी सुरक्षितपणे प्रक्रिया केलेले दात्या मातांचे दूध उपलब्ध होणे म्हणजे अनिश्चिततेच्या काळात मोठा दिलासा ठरू शकतो.

# पुण्यात होणार 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचारवेध साहित्य संमेलन'

■ पुणे (दै. संध्या)

पद्मपाणी फाउंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचारवेध साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदी ज्येष्ठ लेखिका आणि विचारवंत डॉ. प्रज्ञा दया पवार यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. आयोजकांनी केलेल्या नम्र विनंतीला मान देऊन डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी या संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारण्यास आपला सहर्ष होकार दिला आहे, अशी माहिती संमेलनाचे संयोजन समिती अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी प्रेस नोटद्वारे प्रसिद्धीस दिली आहे. हे विशेष वैचारिक साहित्य संमेलन आगामी १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसर



येथे संपन्न होणार आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुरोगामी, विद्रोही आणि कष्टकरी जनतेच्या हक्कांच्या विचारांचा वेध घेणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. संमेलनाचे संयोजन समिती अध्यक्ष राहुल डंबाळे यावेळी म्हणाले, "लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे 'जग बदल घालूनी घाव, सांगूनी गेले मज भीमराव' हे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत. डॉ. प्रज्ञा दया पवार यांचे मराठी साहित्य क्षेत्रातील योगदान आणि त्यांची सामाजिक जाणीव अत्यंत प्रगल्भ आहे. त्यांच्यासारख्या खंबीर आणि ज्येष्ठ विचारवंताचे नेतृत्व या संमेलनाला लाभल्यामुळे या वैचारिक सोहळ्याची उंची आणि समृद्धी अधिक वाढणार आहे."

या संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजन समितीचे प्राज्ञ वैशाली देठे, डॉ. राहुल ससाणे, सतिष वाघमारे आणि संतोष मदने हे विशेष परिश्रम घेत आहेत. संमेलनामध्ये विविध वैचारिक सत्रांचे, परिसंवादांचे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला पुणे शहर व महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते, साहित्यिक, अभ्यासक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तरी सर्व साहित्यप्रेमींनी आणि नागरिकांनी या संमेलनाला बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पद्मपाणी फाउंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघाच्या वतीने करण्यात आले आहे. भाऊ साठे विचारवेध साहित्य संमेलना'च्या नवनियुक्त अध्यक्षा डॉ. प्रज्ञा दया पवार या मराठी साहित्य क्षेत्रातील एक आघाडीच्या, ख्यातनाम कवयित्री, कादंबरीकार, ललित लेखिका आणि प्रखर विचारवंत म्हणून सुपरिचित आहेत. मराठी साहित्यातील दलित, विद्रोही आणि स्त्रीवादी चळवळीत त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. डॉ. प्रज्ञा पवार यांनी आपल्या लेखनातून नेहमीच सामाजिक विषमता, शोषितांचे प्रश्न आणि स्त्रियांच्या हक्कांवर सडेतोड भाष्य केले आहे. त्यांचे 'अंतस्थ', 'उत्कट शब्दवेध', 'मी भिडवू इच्छितेय समोरासमोर डोळे' आणि 'आरपारं' यांसारखे काव्यसंग्रह प्रचंड गाजले आहेत. काव्याव्यतिरिक्त 'धादांत खैरलांजी' (दीर्घ कविता), 'केंद्रांकित' (ललित लेखसंग्रह) आणि 'मातीचा पोत' यांसारख्या वैचारिक व ललित साहित्यातून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

### पुरस्कार आणि सन्मान

त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र शासनाच्या 'कवी केशवसुत पुरस्कारा'सह अनेक नामांकित राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांमध्येही त्यांच्या साहित्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

### वैचारिक भूमिका

महाराष्ट्रातील पुरोगामी, आंबेडकरी आणि समतावादी चळवळींमध्ये डॉ. प्रज्ञा पवार यांचा नेहमीच सक्रिय सहभाग राहिला आहे. चळवळीतील एक खंबीर आणि विवेकी आवाज म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून त्यांची झालेली निवड ही अण्णा भाऊ साठे यांच्या पुरोगामी आणि क्रांतिकारी विचारांना अधिक गती देणारी ठरेल.

## सिंधू महाकुंभाच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या संदेशाला

# महाराष्ट्राचा सलाम

### इंद्रेश कुमार व पाल्गा रिंपोचे यांचा 'राष्ट्रीय एकात्मिक समरसता सन्मान सोहळ्या'त गौरव

■ मुंबई (दै. संध्या)



लडाख येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या ऐतिहासिक सिंधू महाकुंभाने राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समरसता, सर्वधर्म समभाव आणि भारतीय सांस्कृतिक ऐक्याचा प्रभावी संदेश देशभर पोहोचविला. या महत्त्वपूर्ण उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात मोलाची भूमिका बजावणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक व अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य इंद्रेश कुमार तसेच बौद्ध आध्यात्मिक धर्मगुरू पाल्गा रिंपोचे यांचा 'राष्ट्रीय एकात्मिक समरसता सन्मान सोहळ्या'त महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या पुढाकाराने सचिवालय जिमखाना येथे आयोजित करण्यात आलेल्या या भव्य सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, धर्मगुरू आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे म्हणाले की, राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे, विविध धर्म-पंथांमध्ये परस्पर विश्वास, संवाद आणि सामाजिक समरसता वाढविणे ही काळाची गरज आहे. भारतीय संस्कृतीतील "विविधतेत एकता" हा विचार अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, हा उपक्रम महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना अण्णा बनसोडे म्हणाले, "अजितदादांनी माणसालाच विकासाचा केंद्रबिंदू मानले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय आणि विकास पोहोचविणे हीच खरी समाजसेवा असल्याची शिकवण त्यांनी दिली. त्याच विचारांवर आम्ही आजही कार्यरत आहोत." एकात्मतेचे प्रतीक असलेला सन्मान घेतांना इंद्रेश कुमार आणि पाल्गा रिंपोचे यांनी गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शांतता, समता आणि मानवतेच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. आज जगातील अनेक देश युद्धाच्या छायेत असताना भारताने सर्वधर्म समभाव, बंधुता आणि शांततेचा मार्ग जगासमोर ठेवला आहे. समाजातील सर्व घटकांनी परस्पर सौहार्द आणि विश्वास अधिक दृढ करण्यासाठी एकत्र येण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, भारताने जगाला शांतता, विकास आणि सहअस्तित्वाचा मार्ग दाखविला आहे. जागतिक स्तरावर संघर्ष आणि मानसिक अस्थिरतेचे वातावरण निर्माण होत असताना भारत विविधतेतून एकतेचा आदर्श जगासमोर ठेवत आहे. हा सन्मान केवळ दोन व्यक्तींचा नसून राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समरसता आणि भारतीय संस्कृतीच्या चिरंतन मूल्यांचा सन्मान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समरसता आणि सर्वधर्म समभावाचा संदेश देणारा हा सोहळा उपस्थितांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला.

## बचत खात्यांच्या शृंखलेत वाढ

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे दोन नवीन सेव्हिंग्ज अकाऊंट्सची सुरुवात केल्याची घोषणा केली. 'मॅक्स फॉर सिनियर्स' आणि 'मॅक्स फॉर हर' अशी ही दोन उत्पादने असून याचा लाभ अनुक्रमे वरिष्ठ नागरिक आणि महिलांसाठी होणार आहे. विशिष्ट विभागांसाठी ही उत्पादने त्यांच्या महत्त्व पूर्ण अशा सेव्हिंग्ज मॅक्स श्रेणीतील असून ही श्रेणी प्रेफर्ड एन्ट्री लेव्हल सेव्हिंग्ज अकाऊंट्स पैकी असतील. नुकत्याची पीआयबीच्या रिपोर्ट नुसार भारतातील वरिष्ठ नागरिकांची लोकसंख्या ही २०३६ पर्यंत २३० दशलक्षांवर पोहोचणार आहे, म्हणजेच संपूर्ण लोकसंख्येच्या १५ टक्के ही आकडेवारी असेल. त्याच बरोबर सध्या महिला या एकूण बँक अकाऊंट्स पैकी ३९.२ टक्के खातेधारक आहेत, ही आकडेवारी एकूण ठेवींच्या ३९.७ टक्के आहे. मॅक्स फॉर सिनियर्स आणि मॅक्स फॉर हर चे डिझाईन हे या विभागातील ग्राहकांच्या सातत्याने बदलत्या गरजा पूर्ण करण्यासह क्षेत्रातील पहिले वैशिष्ट्य जसे सायबर फ्रॉड कव्हर, १ लाख रुपयांपर्यंत हॉस्पिटलायझेशन कव्हर आणि अन्य सुविधा यामध्ये देण्यात येत आहेत.

## २७४ फरार आरोपींना अटक : मालमत्ता जप्त

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



एकेकाळी भारतात अशी धारणा होती की, आर्थिक गुन्हा करून परदेशात पळून गेलेले आरोपी पुन्हा कधीच कायद्याच्या ताब्यात येणार नाहीत. मोठमोठ्या घोटाळ्यांतील आरोपी अनेक वर्षे परदेशात सुरक्षित राहत असत आणि भारतीय तपास यंत्रणा त्यांना परत आणण्यासाठी प्रतीक्षा करत असल्याचे चित्र दिसत असे. मात्र, गेल्या काही वर्षांत ही परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. आता संदेश स्पष्ट आहे—गुन्हा भारतात झाला असेल आणि आरोपी जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात लपला असला, तरी कायदा त्याचा पाठलाग सोडणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृहमंत्री तथा सहकारमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली फरार आर्थिक गुन्हेगार कायदा (Fugitive Economic Offenders Act) प्रभावीपणे राबविण्यात आला. या व्यापक धोरणाअंतर्गत २०१९ पासून आतापर्यंत ३६ देशांतून २७४ फरार आरोपींना भारतात परत आणण्यात आले असून, १७,८७४ कोटी किमतीच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. ही केवळ आकडेवारी नसून, राजकीय इच्छाशक्ती आणि ठाम निर्णयक्षमतेचे उदाहरण असल्याचे सांगितले जाते. सामान्य नागरिकाच्या दृष्टीने पाहिले, तर सर्वात मोठा बदल सरकारच्या दृष्टिकोनात दिसून येतो. यापूर्वीच्या सरकारांमध्ये फरार आरोपींना भारतात परत आणण्यासाठी आवश्यक राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याची टीका केली जात होती.

फरार आरोपींना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी अमित शाह यांनी गृह मंत्रालयाच्या कामकाजात एकात्मिक, गुप्तचर माहितीवर आधारित आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारे मॉडेल विकसित करण्यावर भर दिला. या पद्धतीमुळे विविध केंद्रीय तपास यंत्रणा, राज्य पोलिस, इंटरपोल, परराष्ट्र मंत्रालय आणि परदेशी सरकार यांच्यातील समन्वय अधिक मजबूत झाला. त्यामुळे अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्येही लक्षणीय प्रगती झाल्याचे दिसून आले.

अमित शाह यांची रणनीती केवळ फरार आरोपींना भारतात परत आणण्यापुरती मर्यादित राहिली नाही. त्यांनी जागतिक स्तरावरील कारवाई, मजबूत समन्वय आणि प्रभावी कूटनीती या तीन महत्त्वाच्या बाबींवर भर देत, फरार आरोपींच्या बेकायदेशीर आणि संशयास्पद मालमत्तांवरही कठोर कारवाई करण्यास गती दिली. १७,८७४ कोटीं रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याने आता आर्थिक गुन्ह्यांमध्ये केवळ आरोपींना शिक्षा देणेच नव्हे, तर गुन्ह्यातून मिळवलेल्या संपत्तीवरही कायदेशीर कारवाई केली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आर्थिक गुन्हा करून परदेशात पळून गेल्यास संपत्ती सुरक्षित राहील, हा समजही खोटा ठरला आहे.

खरे तर फरार आर्थिक गुन्हेगार कायदा (Fugitive Economic Offenders Act) याच उद्देशाने तयार करण्यात आला होता. मोठे आर्थिक गुन्हेगार परदेशात राहून भारतीय न्यायव्यवस्थेपासून दूर राहू नयेत आणि कायदेशीर कारवाई टाळू नयेत, यासाठी या कायद्यात त्यांच्या मालमत्ता जप्त करण्याची तसेच त्यांना न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जाण्यास भाग पाडण्याची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्याला ठाम राजकीय इच्छाशक्ती आणि प्रभावी अंमलबजावणीची जोड मिळाल्यानंतर त्याचे परिणामही दिसून येऊ लागले. सामान्य नागरिकाच्या दृष्टीने हा बदल महत्त्वाचा आहे, कारण आर्थिक गुन्ह्यांचा फटका फक्त सरकारी तिजोरीलाच बसत नाही, तर बँका, गुंतवणूकदार, कर्मचारी आणि संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेलाही त्याचा मोठा परिणाम सहन करावा लागतो.



## भारतीय नौदलात INS मालवण दाखल

■ पुणे (दै. संध्या)

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया)ने भारतीय नौदलात नव्याने दाखल झालेल्या स्वदेशी बनावटीच्या INS मालवण या पाणबुडीविरोधी युद्धनौकेच्या बांधणीसाठी लागणाऱ्या १०० टक्के विशेष नौदल दर्जाच्या पोलादाचा पुरवठा केला आहे. हे पोलाद कंपनीच्या गुजरातमधील हझिरा प्रकल्पात तयार करण्यात आले आहे. कोचिन शिपयार्डने बांधलेली INS मालवण ही आठ माहे-वर्गीय पाणबुडीविरोधी युद्धनौकांपैकी दुसरी युद्धनौका आहे. तिच्यामध्ये ८० टक्क्यांहून अधिक स्वदेशी घटकांचा वापर करण्यात आला आहे. पाणबुडीविरोधी युद्ध, पाण्याखालील देखरेख आणि किनारी सुरक्षेसाठी ही युद्धनौका महत्त्वाची ठरणार आहे. AM/NS इंडिया भारतीय नौदलासाठी बांधण्यात येणाऱ्या आठ युद्धनौकांसाठी आवश्यक विशेष पोलादाचा पुरवठा करत असून, यापूर्वी INS विशाखापट्टणम आणि INS सुरत या युद्धनौकांसाठीही कंपनीने विशेष पोलाद पुरवले आहे.

## भारती एअरटेलची दमदार कामगिरी

■ गुरुग्राम (दै. संध्या)

भारती एअरटेल लिमिटेडने 30 जून 2026 रोजी संपलेल्या तिमाहीचे लेखापरीक्षित एकत्रित आर्थिक निकाल जाहीर केले. आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या तिमाहीत भारती एअरटेलने दमदार कामगिरी करत 1.49 कोटी नवीन ग्राहक जोडले आणि 15 देशांतील एकूण ग्राहकसंख्या 68.1 कोटींवर पोहोचली. कंपनीचा एकत्रित महसूल 18.4 टक्क्यांनी वाढून 58,539 कोटी रुपये झाला, तर भारतातील महसूल 41,214 कोटी रुपये झाला. मोबाईल ग्राहकांकडून मिळणारे सरासरी उत्पन्न (ARPU) 250 रुपयांवरून 264 रुपयांवर वाढले. पोस्टपेड विभागात विक्रमी 10 लाख नवीन ग्राहक जोडले गेले, तर होम ब्रॉडबँड, एअरटेल बिझनेस आणि आफ्रिका व्यवसायातही चांगली वाढ झाली. या तिमाहीत एअरटेलने 5G तंत्रज्ञानावर आधारित पोस्टपेड फास्ट लेन सेवा, उद्योगांसाठी एअरटेल सिक्योर वर्कफोर्स सुरक्षा प्लॅटफॉर्म सुरू केला तसेच देशभरात नवीन टॉवर्स आणि फायबर नेटवर्कचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला.


फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद फुरसुंगी,
ता. हवेली, जि. पुणे-४१२३०८
ई-मेल: fursungi.urulidevachinp2024@gmail.com

जा.क्र./फु.ऊ.दे.न.प/आ.वि/जा.नि/१२२५/२०२५-२६ दिनांक : ०५/०८/२०२६

फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद ता. हवेली जि.पुणे
जाहीर निविदा सुचना क्र. (२०२६-२७)

फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामार्फत खालील नमूद कामांच्या सर्वसाधारण निविदा मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा नगरपरिषदेच्या कार्यालयीन वेळेत दिनांक १३/०३/२०२६ रोजी सकाळी दहा वाजले पासून ते दिनांक ०६/०८/२०२६ रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत नगरपरिषदेच्या कार्यालयात संबंधित विभागाकडे उपलब्ध होतील सीलबंद निविदा कार्यालयात आवक विभागाकडे दिनांक १२/०८/२०२६ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत रोज करावी. निविदा त्याच दिवशी मुख्याधिकारी यांचे कार्यालयीन कक्षात देण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम रुपये | काम पुर्ण करण्याची कालमर्यादा | निविदा फॉर्म रक्कम (फॉर्म फी + जीएसटी) |
|---|---|---|---|---|
| १. | फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद करिता राष्ट्रीय ध्वज पुरविणे. | १०००/- | ३६५ दिवस | ६००/- |

सही/-
मुख्याधिकारी
फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-TENDER Notice**

1) Tenders are invited from registered & reputed firms / companies / electrical contractor through e-Tendering For Tender **for Supply of Tinned Copper Fuse Wire 10/ 12 / 16/14 SWG under Manchar Division.**
**Tender No: EE/MCR/ DO FUSE ELEMENT / T-13 / 2026-27**
**Tender Amt= 2.00 Lakh**
All other details are available on tendering website. http://works.mahadiscom.in/eTender/etender.
**PRO/PZ/099/2026-27**
**EXECUTIVE ENGINEER, MSEDCL, MANCHAR**



**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र.०२०/२६१२२४८५
Web- www.mahapwd.gov.in & e-mail- pune.ee@mahapwd.gov.in
*ई-निविदा सूचना क्रमांक २६ सन २०२६-२०२७*

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४८५/२६१२२४१४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक २७/९/२०१८ व शासन सा. बां. विभाग मुंबई परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ आणि शासन सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २०/५/२०२१ आणि शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक ३१/०८/२०२३ आणि शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/ प्र. क्र. १०४/इमा-२, दिनांक १४/२/२०२५ अन्वये नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत आणि निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या कंत्राटदारांकडून रू. १००.०० लक्षपेक्षा जास्त किंमतीचे कामासाठी बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध/ऑनलाईन विक्री कालावधी आणि निविदा सादर करावयाचा कालावधी | :- | दिनांक ०६/०८/२०२६ सकाळी १०.०० वा.ते दिनांक १४/०८/२०२६ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत. |
| निविदा पुर्व चर्चा बैठक | :- | दि. १०/०८/२०२६ रोजी वेळ दुपारी १५.०० वाजता. मा. अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, पुणे, जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे १ यांचे कार्यालयामध्ये. |
| ऑनलाईन ई निविदा उघडणेचा कालावधी | :- | दिनांक १७/०८/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
3. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे - १ मध्यवर्ती इमारत आवार, पुणे या कार्यालयातील सुचना फलक.

सही/-
(प्रशांत शंकर खैरमोडे)
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे ४११ ००१.

आरओसी-२०२६-२७/क्र-५/C२११४



**पुणे महानगरपालिका, पुणे**
निविदा प्रक्रिया कक्ष विद्युत विभाग
निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. ०७/०८/२०२६ ते दि. १७/०८/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. ०७/०८/२०२६ ते दि. १७/०८/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : १८/०८/२०२६ १५.०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ELECTRICAL/ 2026/159 | विद्युत | पुणे महानगरपालिकेच्या भवनातील जुन्या व नवीन इमारतीमध्ये विद्युत विषयक कामे करणे. | रू. १३५९/- | रु. ३३८८७६४/- | रु. ३३८८८/- | १ | मुकुंद वायकर ९१६८३७७०७९ |
| PMC/ELECTRICAL/ 2026/160 | विद्युत | पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये जुने मुख्य सभा सभागृह येथे नविन वातानुकूलित यंत्रणा पुरविणे, बसविणे व यशस्वीरीत्या चालू करणे. | रू. ६०७९/- | रु. ७३३०१५२/- | रु. ७३३०२/- | १ | मुकुंद वायकर ९१६८३७७०७९ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Yogesh Mali
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/५१० दि. ०५/०८/२०२६



**पुणे महानगरपालिका, पुणे**
निविदा प्रक्रिया कक्ष
ई-निविदा जाहिरात - फेर निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक : दि. ०६/०८/२०२६ ते दि. १२/०८/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. ०६/०८/२०२६ ते दि. १२/०८/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : १३/०८/२०२६ ०३.०० दुपारी

| अ. क्र. | निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PMC/ ELECTRICAL/ 2026/10 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे मुंढवा मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामधील सिवेज पंपिंग स्टेशन व SBR टेक्नोलॉजी करिता नव्याने PLC व स्काडा सिस्टीम व DO ऍनालायझर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. (पुणे मनपा अथवा शासकीय संस्थांचे रेजिस्ट्रेशन अट शिथिल) | 6079.00 | 5615854.00 | 56159.00 | ६ महिने | श्री. वैभव घुले 7447472413 |
| 2 | PMC/ ELECTRICAL/ 2026/11 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे खराडी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामधील सिवेज पंपिंग स्टेशन व SBR टेक्नोलॉजी करिता नव्याने PLC व स्काडा सिस्टीम व DO ऍनालायझर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. (पुणे मनपा अथवा शासकीय संस्थांचे रेजिस्ट्रेशन अट शिथिल) | 6079.00 | 5615854.00 | 56159.00 | ६ महिने | श्री. वैभव घुले 7447472413 |

निविदा संचाची विक्री www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरू राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. www.mahatenders.gov.in
सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल Support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/५०७ दि. ०५/०८/२०२६



**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - ४११०१८**
स्थापत्य विभाग
ई निविदा सुचना क्र. स्थापत्य अ मुख्यालय/AHO/13/01/2026-27

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून खालील नमुद केलेल्या कामासाठी ई टेडरिंग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहे. 1. निविदेचा दर भरताना एकूण निविदा रकमेतुन मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून आलेल्या रकमेवर निविदा दर भरावा. 2. प्रचलित दराने GST बिलात अदा केली जाईल त्यामुळे GST वगळून दर द्यावेत. 3. रॉयल्टी बाबत मनपा. जे धोरण ठरवेल ते आपणांवर बंधनकारक राहील.

| अ. क्र. | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम (4+6) | मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | बयाणा रक्कम रूपये | अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | निविदा फॉर्म फी जी.एस.टी.सह (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| १ | प्रभाग क्र. १५ मध्ये निगडी प्राधिकरण व इतर परिसरात आवश्यकतेनुसार मंडप विषयक कामे करणे. (सन २०२६-२७) | 1,87,14,669 | 1,87,14,669 | 0 | 0 | 1,50,000 | 9,35,740 | 12 | 4,637 |

निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. 06/08 /2026 ते दि. 13/08/2026 |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | :- | दि. 13/08 /2026 दुपारी 3.00 पर्यत |
| निविदापुर्व सभा दिनांक व वेळ | :- | दि. 10/08 /2026 दुपारी 3.00 वाजता |
| निविदापूर्व सभा स्थळ | :- | मा. शहर अभियंता, पिं.चिं.मनपा. यांचे दालनामध्ये |
| निविदा उघडणेचा दिनांक | :- | दि. 14/08 /2026 दुपारी 3.00 वाजता {शक्य झालेस} |

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजुर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरु राहिल.सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
1. www.pcmcindia.gov.in 2. https://mahatenders.gov.in
सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support-epro@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462,0120-4001002,0120-4001005,0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११०१८.

जाहिरात क्र : 2026-27/103
जा. क्र. स्था/05/कावि/203/2026 दिनांक : 05-08-2026



## बिर्ला हॉस्पिटलजवळील पुलाचे तुटलेले कठडे तातडीने दुरुस्त करण्याची मागणी

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी ते डांगे चौक-चिंचवड मार्गावरील बिर्ला हॉस्पिटलजवळील पुलाचे संरक्षक कठडे मुसळधार पाऊस आणि पुराच्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात तुटले असून त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नगरसेवक तथा गटनेते विश्वजीत श्रीरंग बारणे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देऊन पुलावरील तुटलेले कठडे तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी केली आहे. या पुलावरून दररोज हजारो वाहनांची तसेच मोठ्या संख्येने पादचाऱ्यांची ये-जा होत असते. याच मार्गाचा वापर शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि सर्वसामान्य नागरिक नियमितपणे करतात. अशा परिस्थितीत तुटलेल्या कठड्यांमुळे कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची शक्यता असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याचे बारणे यांनी निवेदनात नमूद केले आहे. तसेच संबंधित पुलाची तातडीने पाहणी करून तुटलेले कठडे दुरुस्त करण्यात यावेत आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुरक्षाविषयक उपाययोजना त्वरित राबविण्यात याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे. जनहिताचा विचार करून या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन महापालिका प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा विश्वजीत बारणे यांनी व्यक्त केली आहे.

# ‘ईपीएस’ पेन्शनधारकांच्या पेन्शनमध्ये वाढ करा

### खासदार श्रीरंग बारणे यांची केंद्र सरकारकडे मागणी

■ पिंपरी (दै. संध्या)

कर्मचारी पेन्शन योजना १९९५ (EPS-९५) अंतर्गत येणाऱ्या लाखो पेन्शनधारकांची परिस्थिती अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. अनेकांना एक हजार रुपये किंवा त्यापेक्षाही कमी पेन्शन मिळते. त्यामुळे या पेन्शनधारकांच्या पेन्शनमध्ये वाढ करण्याची मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. याबाबत केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांना निवेदन दिले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, कर्मचारी पेन्शन योजना १९९५ (EPS-९५) अंतर्गत येणाऱ्या लाखो पेन्शनधारकांची परिस्थिती अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. या नागरिकांनी आपल्या आयुष्यातील अनेक वर्षे देशाच्या औद्योगिक, आर्थिक व सामाजिक विकासासाठी योगदान दिले. मात्र आज वृद्धापकाळात त्यांना आर्थिक अडचणी, असुरक्षितता व उपेक्षेला सामोरे जावे लागत आहे. सध्या देशात सुमारे ७५ लाख पेन्शनधारक आहेत. त्यांपैकी ३० लाखांहून अधिक जणांना दरमहा एक हजार रुपये किंवा त्यापेक्षाही कमी पेन्शन मिळते. अनेक प्रकरणांमध्ये ही रक्कम ५०० रुपयांपर्यंत मर्यादित होती. सन २०१४ मध्ये निश्चित करण्यात आलेली किमान एक हजार रुपयांची पेन्शन आजपर्यंत वाढविण्यात आलेली नाही. या काळात महागाई अनेक पटींनी वाढली असून, आज वैद्यकीय तपासणीसाठीही शेकडो रुपये खर्च होतात. अशा परिस्थितीत एक हजार रुपयांत संपूर्ण महिन्याचा उदरनिर्वाह करणे अशक्य आहे.



ईपीएफओ अंतर्गत चालविण्यात येणारी ही योजना निवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांना आर्थिक सुरक्षा देण्यासाठी सुरू करण्यात आली होती. कर्मचाऱ्यांच्या योगदानातून तयार झालेला हा निधी पेन्शनधारकांच्या जीवनाचा आधार असणे अपेक्षित होते. मात्र सध्याच्या परिस्थितीत या योजनेचा मूळ उद्देश पूर्ण होताना दिसत नाही. पेन्शनधारकांचे म्हणणे अत्यंत न्याय्य आहे. एका ज्येष्ठ नागरिकाला दरमहा किमान पाच ते सात हजार रुपये औषधे, अन्नधान्य व अत्यावश्यक गरजांवर खर्च करावे लागतात. अशा परिस्थितीत एक हजार रुपयांची पेन्शन केवळ अपुरीच नाही, तर त्यांच्या सन्मानालाही धक्का देणारी आहे. त्यामुळे अनेक पेन्शनधारकांना आपल्या कुटुंबीयांवर अवलंबून राहावे लागते आणि त्यांचा स्वाभिमान दुखावला जातो.

याशिवाय ईपीएस-९५ पेन्शनधारकांना महागाई भत्ता दिला जात नाही. तसेच त्यांच्यासाठी कोणतीही योग्य आरोग्य विमा किंवा वैद्यकीय सुविधा उपलब्ध नाही. वृद्धापकाळात आरोग्याच्या समस्या अधिक असतात, मात्र उपचारासाठी आवश्यक आर्थिक मदत त्यांना मिळत नाही. राष्ट्रीय संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली देशभरातील पेन्शनधारक गेली अनेक वर्षे आपल्या हक्कांसाठी शांततापूर्ण आंदोलन, सत्याग्रह व निवेदने देत आहेत. दिल्लीतील जंतर-मंतरसह विविध ठिकाणी सातत्याने आंदोलने करण्यात आली आहेत. दुर्दैवाने या संघर्षादरम्यान काही पेन्शनधारकांचे निधनही झाले असून, यावरून या प्रश्नाची गंभीरता स्पष्ट होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते ‘हॅकेथॉन २०२५’च्या विजेत्यांचा गौरव

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे आयोजित ‘पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हॅकेथॉन २०२५’ स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ बुधवारी उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील उपमहापौर कार्यालयात उत्साहात पार पडला. शहराच्या विकासासाठी तंत्रज्ञानाधिष्ठित आणि नाविन्यपूर्ण उपाययोजनांना चालना देणाऱ्या या स्पर्धेतील विजेत्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. स्पर्धेत समाधान नरळे यांनी प्रथम क्रमांक पटकावत रुपये २५ हजार रोख पारितोषिक स्वीकारले. करण कदम यांनी द्वितीय क्रमांक मिळवत रुपये १५ हजार, तर कु.मृण्मयी सावंत यांनी तृतीय क्रमांक मिळवत रुपये १० हजार रोख पारितोषिक मिळविले. द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्यावतीने त्यांच्या पालकांनी पारितोषिक स्वीकारले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना उपमहापौर शर्मिला बाबर म्हणाल्या, “हॅकेथॉनसारख्या स्पर्धा या तरुणांच्या कल्पकतेला आणि तांत्रिक कौशल्याला दिशा देणारे प्रभावी व्यासपीठ आहे. शहराच्या विविध नागरी समस्यांवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याची क्षमता आपल्या युवकांमध्ये आहे. अशा स्पर्धांमुळे नवोन्मेषी विचारांना प्रोत्साहन मिळते आणि भविष्यातील सक्षम, स्मार्ट व नागरिकाभिमुख शहर उभारण्यास निश्चितच मदत होते. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका भविष्यातही अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देईल. या कार्यक्रमास नगरसेविका योगिता नागरगोजे, उपआयुक्त पंकज पाटील, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, दीपक पवार, रमेश आवटे, हेमंत घाडगे, उज्वला करपे, सुनीता चौगुले, संजय जाधव तसेच सामाजिक कार्यकर्ते मंगेश भालेराव आदी उपस्थित होते. कार्यक्रमात विजेत्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच महापालिकेच्या विविध सेवांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि नागरिककेंद्रित नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी भविष्यातही अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.




### सुनेत्रा पवारांवरील वक्तव्याच्या निषेधार्थ पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचे आंदोलन

पिंपरी : दैनिक संध्या

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविषयी काँग्रेसकडून करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचे पडसाद पिंपरी-चिंचवड शहरात उमटले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने करत काँग्रेसच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी “सुनेत्रा वहिनी गुंगी नहीं, आंधी है” अशा घोषणा देत काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सुनेत्रा पवार यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल जाहीर माफी मागावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट यांनी यावेळी माध्यमांशी संवाद साधताना, “महिलांचा अपमान करणारी भाषा कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. काँग्रेसच्या नेत्यांनी तातडीने माफी मागावी. अन्यथा राज्यातील महिला त्यांना लोकशाही मार्गाने धडा शिकवतील,” असा इशारा दिला. या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान परिसरात काही काळ घोषणाबाजी सुरू असून पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता.

### ४ ऑगस्टपर्यंत महापालिकेचा ५५६ कोटींचा मालमत्ता कर वसूल

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२६ ते ४ ऑगस्ट २०२६ (दुपारी १२ वाजेपर्यंत) या कालावधीत ५५६ कोटी ८४ लाख ३४ हजार ७२९ रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. कर संकलन विभागाच्या विविध सवलत योजनांना मिळकतधारकांनी चांगला प्रतिसाद दिला असून अद्यापपर्यंत ज्या मिळकतधारकांनी मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तो विलंब न करता भरावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## नाना पाटील यांना जयंतीनिमित्त अभिवादन

■ पिंपरी (दै. संध्या)




भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारक, 'प्रती सरकार'चे शिल्पकार, शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे लोकनेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी,उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे,उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच महापालिकेतील प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील अतुलनीय योगदानाचे स्मरण केले. ब्रिटिश सत्तेविरोधात निर्भयपणे उभे राहत त्यांनी जनतेच्या सहभागातून 'प्रती सरकार'ची स्थापना करून स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकारली. शेतकरी, कष्टकरी आणि वंचित समाजघटकांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी दिलेला संघर्ष भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणादायी अध्याय म्हणून ओळखला जातो.

राष्ट्रप्रेम, सामाजिक न्याय, लोकशाही मूल्ये आणि जनकल्याण यांना सर्वोच्च प्राधान्य देत क्रांतिसिंह नाना पाटील यांनी आयुष्यभर समाजहितासाठी कार्य केले. त्याग, संघर्ष आणि निःस्वार्थ समाजसेवेचा त्यांचा आदर्श आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या विचारांतून राष्ट्रसेवा आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा मिळत राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या या महान क्रांतिकारकाचे कार्य, विचार आणि राष्ट्रसेवेचा वारसा जतन करून तो नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करून समाजहित, लोककल्याण आणि राष्ट्रनिर्मितीसाठी कार्य करण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

## दापोडीमध्ये दुचाकीत आढळला तस्कर साप; सर्पमित्राने केले सुखरूप रेस्क्यू

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरातील दापोडी परिसरात एका दुचाकीत बिनविषारी तस्कर जातीचा साप आढळून आल्याने काही काळ नागरिकांमध्ये घबराट पसरली. मात्र सर्पमित्र जयवर्धन कांबळे यांनी तत्परता दाखवत सापाचे सुरक्षित रेस्क्यू केल्याने संभाव्य अनर्थ टळला.

दापोडी येथील आराध्य ढोल-ताशा पथकाच्या सरावाच्या ठिकाणी उभी असलेल्या एका दुचाकीमध्ये साप दडून बसल्याचे काही युवकांच्या निदर्शनास आले. गाडीच्या भागात हालचाल दिसताच त्यांनी तातडीने सर्पमित्र जयवर्धन कांबळे यांच्याशी संपर्क साधला.

माहिती मिळताच कांबळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी अत्यंत कौशल्याने आणि सावधगिरी बाळगत दुचाकीच्या आतील भागातून बिनविषारी तस्कर सापाला बाहेर काढले. रेस्क्यूदरम्यान सापाला कोणतीही इजा झाली नाही. त्यानंतर त्याला सुरक्षितपणे त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात आले. दरम्यान, सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने सापांसह विविध सरपटणारे प्राणी आसऱ्याच्या शोधात वाहनांमध्ये, चप्पल-बुटांमध्ये किंवा अडगळीच्या ठिकाणी लपण्याच्या घटना वाढतात. त्यामुळे नागरिकांनी दुचाकी किंवा चारचाकी वाहन सुरू करण्यापूर्वी तसेच चप्पल-बूट वापरण्यापूर्वी त्यांची काळजीपूर्वक पाहणी करावी, असे आवाहन सर्पमित्र जयवर्धन कांबळे यांनी केले आहे.

## माफी मागा, अन्यथा मावळात जनआक्रोश उभा राहील : आ. सुनील शेळके



■ तळेगाव दाभाडे (दै. संध्या)

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविषयी करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले असतानाच मावळचे आमदार सुनील शेळके यांनीही आक्रमक भूमिका घेत संबंधित काँग्रेस नेत्यांनी सुनेत्रा पवार यांची जाहीर माफी मागावी, अशी ठाम मागणी केली आहे. अन्यथा मावळातील नागरिकांच्या तीव्र जनआक्रोशाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. महिलांविषयी अवमानकारक आणि असभ्य भाषेचा वापर कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट करत आमदार शेळके म्हणाले की, सार्वजनिक जीवनात कार्यरत असलेल्या महिलांचा सन्मान राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. राजकीय मतभेद असू शकतात, मात्र त्यासाठी महिलांविषयी अपमानास्पद वक्तव्य करणे ही महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी बाब आहे. अशा प्रवृत्ती केवळ माफी मागून थांबणार नाहीत, तर त्यांना राजकीय आणि सामाजिक स्तरावर ठामपणे उत्तर दिले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. सुनेत्रा पवार यांच्याविषयी करण्यात आलेल्या वक्तव्याचा राष्ट्रवादी काँग्रेससह विविध स्तरांतून निषेध व्यक्त होत असून, संबंधितांनी तातडीने जाहीर माफी मागून आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

## पार्किंग पॉलिसीची प्रभावी अंमलबजावणी होणार : महापौर

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित आणि नागरिकाभिमुख करण्याच्या उद्देशाने पार्किंग पॉलिसीच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी विद्यमान पार्किंग व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेऊन भविष्यातील गरजा लक्षात घेऊन अधिक सक्षम, व्यवहार्य आणि नागरिकांना दिलासा देणारी पार्किंग व्यवस्था उभारण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर तसेच संबंधित अधिकारी आणि सल्लागार उपस्थित होते. बैठकीत यापूर्वीच्या पार्किंग पॉलिसीच्या अंमलबजावणीत आलेल्या अडचणी, त्रुटी, त्यामागील कारणे तसेच त्यावरील उपाययोजनांचा सखोल आढावा घेण्यात आला. शहरातील वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या आणि प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेऊन पार्किंग व्यवस्थेचे पुनर्नियोजन करण्याची आवश्यकता यावेळी अधोरेखित करण्यात आली. रस्त्यांवरील अनधिकृत पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी कमी करणे, नागरिकांना सुलभ पार्किंग सुविधा उपलब्ध करून देणे, व्यापारी भाग, सार्वजनिक ठिकाणे आणि प्रमुख चौकांमध्ये नियोजनबद्ध पार्किंग व्यवस्था उभारणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

यावेळी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी पार्किंग पॉलिसीच्या अंमलबजावणीबाबत सादरीकरण करत आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा मांडला. तसेच शहराच्या विविध भागांतील पार्किंगची सद्यस्थिती, उपलब्ध जागा, भविष्यातील गरजा आणि नियोजनाबाबत आवश्यक सूचना व प्रस्तावही सादर करण्यात आले.

> “पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या आणि वाहनांची संख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेला अधिक शिस्तबद्ध आणि कार्यक्षम बनविण्यासाठी प्रभावी पार्किंग पॉलिसीची अंमलबजावणी ही काळाची गरज आहे. नागरिकांना सोयीस्कर, सुरक्षित आणि सुलभ पार्किंग सुविधा उपलब्ध करून देतानाच वाहतूक कोंडी कमी करणे, रस्त्यांचा कार्यक्षम वापर करणे आणि शहराच्या नियोजनबद्ध विकासाला चालना देणे हे महापालिकेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकाभिमुख आणि व्यवहार्य पार्किंग व्यवस्था उभारावी.”
> **- महापौर रवि लांडगे**

# कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी जनजागृती उपक्रम

### ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा चार प्रकारांत वेगळा करण्याचे नागरिकांना आवाहन

■ पिंपरी (दै. संध्या)



सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडून नागरिकांमध्ये कचरा विलगीकरणाबाबत व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. घरातून निर्माण होणारा कचरा ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य अशा चार प्रकारांत विलगीकरण करून महापालिकेच्या घंटागाडीला देण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत शहरातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात घरोघरी भेटी देऊन नागरिकांना कचरा विलगीकरणाचे महत्त्व समजावून सांगण्यात येत आहे. तसेच विविध परिसरांमध्ये जनजागृती उपक्रम आणि नागरिकांशी थेट संवाद साधून कचरा व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले जात आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ नुसार प्रत्येक नागरिकाने आपल्या घरातील कचरा विलगीकरण करून देणे आवश्यक आहे. ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी कचरा तसेच विशेष काळजीयोग्य कचरा स्वतंत्रपणे जमा केल्यास त्यावर प्रक्रिया करणे सुलभ होते. यामुळे पुनर्वापराला चालना मिळते, कचरा प्रक्रिया अधिक परिणामकारक होते आणि लँडफिलवर जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यास मदत होते, अशी माहिती महापालिकेकडून देण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे म्हणाले, “स्वच्छ आणि पर्यावरणपूरक पिंपरी चिंचवड घडविण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रत्येक घरातून कचऱ्याचे चार प्रकारांत योग्य विलगीकरण झाल्यास शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम होईल. नागरिकांनी महापालिकेच्या या उपक्रमाला सहकार्य करावे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, “स्रोतस्थळी कचरा विलगीकरण हा शाश्वत कचरा व्यवस्थापनाचा मूलभूत टप्पा आहे. ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा स्वतंत्रपणे दिल्यास कचरा प्रक्रियेला गती मिळते आणि स्वच्छ शहराच्या उद्दिष्टपूर्तीस मदत होते.”

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले, “महापालिकेच्या माध्यमातून प्रत्येक प्रभागात नागरिकांशी संवाद साधून कचरा विलगीकरणाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवून कचरा व्यवस्थापन व्यवस्था अधिक प्रभावी करण्यावर भर दिला जात आहे.”

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, “घरातूनच कचऱ्याचे योग्य विलगीकरण केल्यास त्यावरील प्रक्रिया अधिक सुलभ आणि परिणामकारक होते. पर्यावरण संरक्षण तसेच सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने प्रत्येक नागरिकाने कचरा चार प्रकारांत वेगळा करून द्यावा.” महापालिकेच्या या जनजागृती अभियानाला शहरातील नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, स्वच्छ, सुंदर आणि वसुंधरापूरक पिंपरी चिंचवड घडविण्यासाठी कचरा विलगीकरणाची सवय रुजविण्यासाठी महापालिकेकडून सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ब्लूमिंगडेल स्कूलमध्ये कृतज्ञतेचा सोहळा

**नारायणगाव : दैनिक संध्या**

नारायणगाव येथील ब्लूमिंगडेल स्कूलमध्ये गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून भारतीय गुरु-शिष्य परंपरेला उजाळा देणारा एक विशेष कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांबद्दल वाटणारा आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाची सुरुवात महर्षी वेदव्यास यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन आणि गुरुवंदनेने झाली. या प्रसंगी शाळेचे प्राचार्य डॉ. हितेश शर्मा आणि इतर समन्वयकांच्या हस्ते पूजन करण्यात आले. प्राचार्यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना शिक्षक, पालक आणि वडीलधाऱ्या व्यक्तींबद्दल नेहमी नम्रता व कृतज्ञता बाळगण्याचे आवाहन केले, तसेच शैक्षणिक मूल्यांचे जतन करण्याचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी केलेले गुरुपूजन होते, ज्याने संपूर्ण वातावरण भावूक आणि मंगलमय बनले. नर्सरी ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी या सोहळ्यात अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सई डुंबरे आणि प्रिशा घुले यांनी केले, तर उपस्थितांचे स्वागत श्रीशा फूलसुंदर व लावण्य हुकरे यांनी केले. तसेच आराध्या भालेराव, आयुष बंगाल, मयुरेश भंडारी, आरोही लेंडे, सालस पडवळ आणि मंदिरा लेंडे यांनी विविध सादरीकरणे केली. शेवटी पार्थ खोसे याने सर्वांचे आभार मानले.





### विद्यार्थी नेतृत्वासाठी शालेय निवडणूक प्रक्रिया संपन्न

**नारायणगाव : दैनिक संध्या**

विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच लोकशाहीची मूल्ये रुजावीत आणि त्यांना निवडणूक प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने जुन्नर एज्युकेशन सोसायटीच्या प्राचार्य सबनीस प्राथमिक विद्यालयात चौथीच्या वर्गासाठी 'विद्यार्थी प्रतिनिधी' निवडणूक अतिशय उत्साहात पार पडली. भारतीय लोकशाही व्यवस्थेत मतदानाचे असलेले महत्त्व आणि हक्क विद्यार्थ्यांना समजणे गरजेचे आहे, याच भावनेतून या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निवडणुकीदरम्यान विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज भरणे, प्रचार करणे, मतपेटीचा वापर करून गुप्त मतदान करणे आणि शेवटी मतमोजणी करणे अशा विविध टप्प्यांचा थेट अनुभव घेतला.शाळेच्या मुख्याध्यापिका उर्मिला थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली विकास गवते यांनी या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे काटेकोर नियोजन व आयोजन केले. या चुरशीच्या निवडणुकीतून शौर्य शिंदे, आरुष गवारी, श्रेयाली महाबरे, अर्श मणियार आणि आरुष डोळस यांची 'विद्यार्थी प्रतिनिधी' म्हणून बहुमताने निवड करण्यात आली. तर दीपक वाळुंज, विलेखा कर्पे, अपूर्वा श्रोत्री, अस्मिता कड्डू, आरती ससाणे आणि समर्थ लोणकर यांनी निवडणूक अधिकारी म्हणून आपली जबाबदारी चोख पार पाडली. जुन्नर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाचे भरभरून कौतुक केले असून, विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीचे संस्कार घडवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

### महिला प्रदेशाध्यक्षापदी वैशाली नागवडे तर युवक प्रदेशाध्यक्षपदी निखिल ठाकरे

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**



राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षापदी वैशाली नागवडे तर युवक प्रदेशाध्यक्षपदी निखिल ठाकरे यांची निवड झाल्याचे नियुक्तीपत्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी देवगिरी बंगल्यावर दिले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या मान्यतेने ही नियुक्ती करण्यात आली आहे. देवगिरी बंगल्यावर राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी नियुक्तीपत्र दिल्यावर वैशाली नागवडे व निखिल ठाकरे यांनी प्रदेश कार्यालयात दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेसमोर नियुक्ती पत्र ठेवून अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, सहकोषाध्यक्ष संजय बोरगे, प्रदेश प्रवक्ते सुरज चव्हाण, कार्यालयीन सचिव संजय तटकरे आदी उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित महिला प्रदेशाध्यक्षा वैशाली नागवडे म्हणाल्या की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने जो विश्वास दाखवला तो सार्थ ठरवत पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी मी माझ्या सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

### कलासारथी कला मंच या संस्थेचा पहिला वर्धापनदिन साजरा !

**जुन्नर : दैनिक संध्या**




जुन्नर तालुक्यातील बल्लाळवाडी येथील राजाराम पाटिल वृद्धाश्रमात कलासारथी कला मंच पुणे रजि या संस्थेचा पहिला वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वर्धापनदिनाचे औचित्य साधुन स्व एकनाथशेठ होनराव याच्यां स्मरणार्थ वृध्दांना चादरीचे व इतर साहित्यांचे वाटप करण्यात आले व वृद्धाश्रमातील निराधार मातापित्यांनां गोड भोजन देण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. सतिश जाधव लाला अर्बन सहकारी बँक अधिकारी.कमलेश थोरात सावली फाऊंडेशन अध्यक्ष डेरिंग द बारामती फाईल, नाद एकच बैलगाडा शर्यत,अभिनेते, निर्माते दिग्दर्शक,आदित्य राजे मराठे, चित्रपट अभिनेत्री घोडेगाव ची कन्या ऐश्वर्या मारुती दौंड.ह.भ.प.विकास महाराज हगवणे.मा निळकंठशेठ होनराव. सचिन शेठ होनराव. दीपक भाऊ घोडेकर, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे गणेश पुजन जयेश शिंदे , व दिप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सुत्रसंचलन संतोष नेहरकर, प्रास्ताविक शंकर ठोंबरे, कार्य आढावा रामदास काळे यांनी केला.व पाहुण्यांचे स्वागत हेमंत काळे यांनी केले. समारोप आभार कांताताई मस्करे यांनी केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयेश शिंदे, उपाध्यक्ष, कांताताई मस्करे,संस्थापक रामदास काळे, कोषाध्यक्ष शंकर ठोंबरे, सहकोषाध्यक्ष हेमंत काळे, प्रमुख सल्लागार प्रकाश नेहरकर,व कार्यकारिणी सदस्य संतोष नेहरकर इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.


# समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**१,९७१ लाभांचे वितरण**

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

राजगुरुनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात' एक हजार ९७१ लाभार्थ्यांना लाभांचे वितरण करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या



या शिबिरात महसूल, जात व उत्पन्न प्रमाणपत्र, सातबारा, फेरफार, वारस नोंद, निवास दाखले, रेशन कार्ड, कृषी, वन, शिक्षण, महिला व बालविकास, ग्रामविकास तसेच विविध राज्य व केंद्र शासनाच्या योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनेक अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्यात आली, तर उर्वरित अर्ज संबंधित विभागांकडे प्राधान्याने निकाली काढण्यासाठी पाठविण्यात आले.

शिबिरात राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. त्यामध्ये महिलांना शेतकरी दर्जा प्रमाणपत्र, गावठाण स्वामित्व सनद, मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना, शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमितीकरण, जिवंत ७/१२ मोहीम, सिंधी विस्थापितांसाठी विशेष अभय योजना, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल लाभार्थ्यांसाठी विशेष तरतूद, कुंभार समाजासाठी व्यवसाय सवलत, कौटुंबिक वाटणीपत्रावरील नोंदणी शुल्क माफी, विविध दाखल्यांचे वाटप, रेशन कार्ड, नैसर्गिक आपत्ती प्रमाणपत्रे, कृषी योजनांचा लाभ, पीएम-किसान योजना, महिला बचत गटांना कर्ज मंजुरी, सीआयएफ निधी, लक्ष्मी मुक्ती योजना, आदिशक्ती पुरस्कार, राजपत्र आदेश, कलम १५५ प्रकरणे, उत्कृष्ट बीएलओ सन्मान तसेच रक्तदान शिबिर आदी उपक्रमांचा समावेश होता.

यावेळी उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेडसे, पंचायत समिती सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे, तनुजाताई घनवट, विनयाताई मुंगसे, गणेश आरगडे, दिप्तीताई भोगाडे, गणेश बोत्रे, समीर सुपे, चाकण नगराध्यक्षा मनीषा गोरे, पंचायत समिती सदस्य माऊली ढेरंगे, दिलीप डुबे, गौरी मुन्हे, रुपाली कांबळे, सारिका गोगावले, प्रसाद घेनंद, कविता राक्षे, शंकर कावडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक राक्षे, उपसभापती रणजीत गाडे, संदीप सोमवंशी, पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, शांताराम भोसले, उपअधीक्षक भूमी अभिलेख नितीन सूर्यवंशी, सहायक गटविकास अधिकारी सुनील भोईर, नायब तहसीलदार मनीषा खैरे, रविंद्र मोरे, राम बीजे, निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे, वन विभागाचे कंक, पुरवठा अधिकारी महादेव कुंभार, गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले, महिला व बालविकास अधिकारी सारिका देशमुख, खासदार अमोल कोल्हे यांचे स्वीय सहाय्यक तेजस झोडगे, तृप्तीताई मांडेकर, प्रियाताई पवार, संतोष गोरडे, काळुराम थोरवे, सयाजीराजे मोहिते तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

**राज्य शासनाच्या विविध योजनांचे लाभ : ७९२**

पीएम-किसान लाभार्थी : २२
महिला बचत गट व इतर योजनांचे लाभ : ५७ इतर लाभ, राजपत्र आदेश, रक्तदान, बीएलओ सन्मान आदी : ६३ असे सर्व १९७१ लाभार्थ्यांना विविध योजनाचा या शिबिरात लाभ देण्यात आला.

## दूध भेसळ प्रकरण भरकटविण्याचा डाव

■ मंचर (दै. संध्या)

"दूध भेसळ प्रकरणाचा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हा अध्यक्ष देवदत्त निकम यांनी सातत्याने पाठपुरावा करून प्रभावीपणे आवाज उठविला आहे. त्यामुळे या गंभीर प्रश्नाकडून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी त्यांच्यावर बिन बुडाचे आरोप करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा दूध भेसळीचा मुद्दा डायव्हर्ट करण्याचा डाव आहे."असे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आंबेगाव तालुका युवक अध्यक्ष गणेश यादव यांनी सांगितले. मंचर(ता. आंबेगाव)येथे झालेल्या पत्रकार परिषदेत यादव बोलत होते यावेळी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आंबेगाव तालुका युवक अध्यक्ष विशाल वाबळे उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीनंतर साडेपाच एकर शेतजमीन निकम यांनी खरेदी केल्याचा आरोप करत या प्रकरणाची आयकर विभागाकडे तक्रार करणार असल्याचे बांगर यांनी जाहीर केले होते.

## दौंड-पुणे लोकलसाठी राहुल कुल यांची रेल्वेमंत्र्यांसोबत निर्णायक बैठक

**मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद**

■ यवत (दै. संध्या)

पुणे लोहमार्गावर दररोज प्रवास करणाऱ्या लाखो नागरिक, नोकरदार, विद्यार्थी, व्यापारी आणि रुग्णांच्या सोयीसाठी आमदार ॲड. राहुल कुल यांनी सातत्याने सुरू ठेवलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळताना दिसत आहे. या मार्गावर ईएमयू (EMU) लोकल ट्रेन सुरू करण्यासह विविध प्रलंबित मागण्यांबाबत आमदार राहुल कुल यांनी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. ही भेट अत्यंत सकारात्मक ठरली असून, रेल्वेमंत्र्यांनी ईएमयू लोकल सेवेचा प्रश्न युद्धपातळीवर मार्गी लावण्याचे ठोस आश्वासन दिले आहे. यावेळी मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे हे देखील विशेष उपस्थित होते.



दौंड-पुणे रेल्वे कॉरिडॉरच्या समस्यांबाबत आमदार ॲड. राहुल कुल यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास सर्व बाबी आणून दिल्या होत्या. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी स्वतः केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे पत्रव्यवहार करून या मागण्या प्राधान्याने सोडवण्याची शिफारस केली होती. या पार्श्वभूमीवर दिल्ली येथे आमदार राहुल कुल यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली आहे

> "दौंड – पुणे रेल्वे कॉरिडॉर हा या भागाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचा कणा आहे. प्रवाशांना भेडसावणारे प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी आमचे नेते मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आमचा सतत पाठपुरावा सुरू आहे. केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक आश्वासनामुळे लवकरच दौंडकरांचा प्रवास अधिक सुखकर आणि जलद होईल."
>
> - ॲड. राहुल कुल, आमदार (दौंड विधानसभा)

यावेळी आमदार ॲड. कुल यांनी सध्या धावणाऱ्या जुन्या DEMU / MEMU गाड्यांऐवजी वेगवान ईएमयू लोकल सेवा तातडीने सुरू करावी, ज्यामुळे वेळेची बचत होईल आणि महिला, दिव्यांग तसेच फर्स्ट क्लाससाठी स्वतंत्र डबे उपलब्ध होतील. गाड्यांमध्ये वारंवार होणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी त्वरित दुरुस्ती व अद्ययावत यंत्रणा उभी करावी, सकाळी ६:०० वाजता दौंडवरून सुटणारी DEMU गाडी हडपसरऐवजी थेट पुणे जंक्शनपर्यंत नेण्यात यावी, सकाळ - संध्याकाळच्या पीक अवर्समध्ये गाड्यांच्या फेऱ्या वाढवणे आणि सकाळी ८:२० ते दुपारी ५:०० या वेळेत नवीन गाड्या सुरू करण्यात याव्यात, दौंड येथील इलेक्ट्रिक लोको शेडचे काम जलद गतीने पूर्ण करणे. आदी मागण्या केलेल्या आहेत.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेत दौंड-पुणे मार्गावरील इलेक्ट्रिक लोको शेडचे काम प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच, या मार्गावर ईएमयू (EMU) लोकल सुरू करण्याबाबतची प्रक्रिया युद्धपातळीवर पूर्ण करून निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले आहे.

## करंजाळे परिसरात रस्ता खचल्याने वाहतूक ठप्प

■ नारायणगाव (दै. संध्या)

माळशेज परिसरातील कल्याण-नगर महामार्गावर करंजाळे गावाजवळ रस्ता खचल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून वाहतुकीची मोठी कोंडी होत आहे. रस्त्या दुरुस्तीचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांचा संयम आता संपत चालला आहे. मुसळधार पावसामुळे या मार्गावरील सुमारे १०० ते २०० फूट लांबीचा आणि १५ ते २० फूट खोल भाग खचला आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने या भागातील वाहतूक पूर्णपणे बंद केली आहे. मात्र, प्रशासनाने या निर्णयाची कोणतीही पूर्वसूचना न दिल्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले आहे. माळशेज घाट परिसर हा पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध असल्यामुळे या भागात वीकेंडला मोठी गर्दी होते. परंतु, रस्ता बंद असल्याने पर्यटकांनी याकडे पाठ फिरवली आहे. याचा थेट परिणाम



स्थानिक हॉटेल व्यावसायिक, मार्गदर्शक आणि छोट्या विक्रेत्यांवर झाला असून त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच या मार्गावरून मुंबईकडे जाणारी भाजीपाल्याची वाहतूकही ठप्प झाली आहे.

शनिवारी रात्री खिरेश्वर ते पिंपळगाव परिसरात तब्बल १५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यामध्ये महिला आणि लहान मुलांसह शेकडो प्रवासी तासन्तास अडकून पडले होते.

महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करून वाहतूक पूर्ववत करावी.प्रवाशांच्या सोयीसाठी एसटी महामंडळाने लवकरात लवकर बस सेवा सुरू करावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

## चाकण सोसायटीच्या अध्यक्षपदी दत्तात्रय गोरे

■ चाकण(दै. संध्या)

शेतकऱ्यांचे हित जोपासणाऱ्या येथील चाकण विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी दत्तात्रय गोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. राजश्री गोरे यांनी आपल्या अध्यक्ष पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने इतरांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी म्हणून स्वखुशीने राजीनामा दिला होता. त्यामुळे हे पद रिक्त झाले होते. त्यासाठी निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली. अध्यक्ष पदासाठी दत्तात्रय गोरे यांचाच एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी एस. एम. बगाटे यांनी केली. निवडणूक प्रक्रियेसाठी सोसायटीचे सचिव अरुण धाडगे यांचे त्यांना विशेष सहकार्य



लाभले. याप्रसंगी राजश्री गोरे, राजेंद्र खेडकर, अशोक परदेशी, बाबाजी राक्षे, जगदीश मेदनकर, अशोक कड, बाळासाहेब पठारे, अशोक गोरे, अभिषेक मुटके, कालिदास वाडेकर, बबन गायकवाड, शोभा कड, मनोज खांडेभराड आदी उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष दत्तात्रय गोरे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

## रोटरी क्लबच्यावतीने वृक्षारोपण



■ चाकण (दै. संध्या)

चाकण रोटरी क्लब व चाकण डॉक्टर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण सप्ताहाचे औचित्य साधून चाकण शहर व परिसरात रोटरीचे अध्यक्ष किशोर भोसले यांच्या पुढाकारातून सामुदायिक वृक्षारोपण करण्यात आले. सामुदायिक वृक्षारोपण या उपक्रमांतर्गत येथील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा, श्री शिवाजी विद्यामंदीर, विद्या व्हॅली इंटरनॅशनल स्कूल तसेच जिल्हा परिषदेची मराठी शाळा राक्षेवाडी येथे एकूण २५ वृक्षांची लागवड करण्यात आली. या लोकोपयोगी अभियानामध्ये चाकण रोटरी क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले यांच्यासह चाकण डॉक्टर असोसिएशनचे सदस्य, शिक्षक, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश दिला. वृक्षारोपणाबरोबर प्रत्येक वृक्षाचे संगोपन व संरक्षण करण्याचा संकल्प यावेळी डॉ. संपत केदारे, अध्यक्ष किशोर भोसले व सचिव डॉ. भरत राऊत आदींनी केला. यावेळी डॉ. अमोल बेनके, डॉ. अश्विनी गेठे, डॉ. रावसाहेब आवटे, डॉ. भूषण नाईक, डॉ. विजय भवारी, सुशांत चव्हाण, एस.पी. देशमुख शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शामराव देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहिणी देशमुख, प्राचार्या स्वाती रणदिवे आदीसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षिका, पालक व सेवक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दांपत्याचा लेण्याद्रीला शाही विवाह सोहळा

■ जुन्नर (दै. संध्या)

अनुसचित जमातीतील चार गरजू तसेच दोन अंध, अपंग उपवर दांपत्यांचा मोफत पण शाही विवाह सोहळा लेण्याद्री येथे संपन्न झाला .मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजपचे युवा मोर्चाचे पुणे जिल्हाध्यक्ष आणि अश्वमेध युवा मंचचे प्रवर्तक गणेश कवडे यांच्या संकल्पनेतून विधायक कामांची उतराई म्हणून या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. वधूवरांना ३ पोषाख, वधुसाठी सोन्याचे मंगळसूत्र, संसारपयोगी साहित्य मंचच्या योगदानातून देण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका संघचालक अरुण कबाडी, तालुका कार्यवाह संदीप धानापुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत गणेशपुजन, तर म्हाडाचे अध्यक्ष माजी खासदार शिवाजीराव आढळराव यांच्या हस्ते साखरपुड्याने सोहळ्याचा प्रारंभ, तर बजरंग दलाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संयोजक नितीन महाजन यांच्या उपस्थितीत पारंपरिक पद्धतीने हळदी समारंभ संपन्न झाला. राजकारणात उच्च स्तरावर लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असूनही स्वतःचा विवाह



सामुदायिक विवाह सोहळ्यात संपन्न केलेले आमदार सत्यजित तांबे यांची उपस्थिती या सोहळ्याचे वेगळेपण ठरली. यावेळी विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, उपाध्यक्ष अशोक घोलप, शिवनेरी भूषण पुरुस्कार विजेते माऊली महाराज वाबळे, ह.भ.प.गणेश महाराज वाघमारे, भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सायली बोत्रे, भाजपा प्रदेश सचिव पुनम चौधरी, भाजपा सरचिटणीस डॉ. ताराचंद कराळे,जिल्हाध्यक्ष उद्योग आघाडी प्रमोद बाणखेले, जिल्हाध्यक्ष भाजपा बेटी बचाव आघाडी अनघा पाठक, जिल्हाध्यक्ष अनुसूचित जमाती गणेश धनवीले, तसेच जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अंकुश आमले, मोहीत ढमाले, सुमित्रा जाधव, मावळ पंचायत समिती माजी उपसभापती कल्याणी ठाकर, पंचायत समिती सदस्य राजू पिंगट, संजय व्हाडी, लेण्याद्री देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय ढेकणे, विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब कवडे, विश्वस्त मंडळ पदाधिकारी, जुन्नरचे नगरसेवक नंदू तांबोळी, अनिल रोकडे यावेळी उपस्थित होते. शाही मिरवणूकीने हा सोहळा संपन्न झाला.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे



### शक्ती ऑन व्हील्स प्रदर्शनी व विक्री व्हॅनचे उद्घाटन

मुंबई (दैनिक संध्या) : शहरातील महिला बचत गटांनी तयार केलेले खाद्यपदार्थ आणि दैनंदिन वापराच्या वस्तू शासकीय कार्यालये व वसतीगृहांमध्ये सहज उपलब्ध झाल्यास नोकरदार महिलांना मोठा दिलासा मिळेल, असे सांगून राज्यात अशा स्वरूपाचे 'शक्ती ऑन व्हील्स' उपक्रम अधिक व्यापक प्रमाणात राबविण्यात यावेत, अशी अपेक्षा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केली. सचिवालय जिमखाना येथे 'शक्ती ऑन व्हील्स' या प्रदर्शनी व विक्री व्हॅनचे उद्घाटन मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. अनिर्वेदशक्ती फाउंडेशनच्या माध्यमातून महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांच्या विक्रीसाठी हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. फाउंडेशनच्या संस्थापक आर. विमला यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकार झाला आहे. यावेळी मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, जिल्ह्यातील विविध बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी आणि त्यांची थेट ग्राहकांपर्यंत पोहोच वाढावी, या उद्देशाने हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. विविध शासकीय कार्यालये तसेच मेट्रो स्थानक परिसरात अशा विक्री व्हॅन कार्यरत झाल्यास महिला उद्योजकांच्या व्यवसायाला चालना मिळेल. रेडी-टू-ईट पदार्थ, मिलेट उत्पादने, घरगुती वस्तू आणि दैनंदिन वापरातील साहित्य नोकरदार महिलांना त्यांच्या कार्यस्थळी सहज उपलब्ध झाल्यास त्यांचा वेळ वाचेल आणि दैनंदिन जीवन अधिक सुलभ होईल. फाउंडेशनच्या संस्थापक व निवृत्त सनदी अधिकारी आर. विमला यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरणासाठी अनेक संस्था काम करीत असतात. महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही समस्या असल्याचे निदर्शनात आले. यावर उपाय म्हणून ग्राहकांना त्यांच्या सोयीप्रमाणे उत्पादने उपलब्ध करून दिल्यास त्याची मागणी वाढू शकते, यामुळे महिला बचत गटांच्या महिलांचा उद्योग वाढण्यासही मदत होईल.

### मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रमात बदल

मुंबई (दैनिक संध्या) : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) कार्यक्रमाच्या वेळापत्रकात सुधारणा केली आहे. सुधारित कार्यक्रमानुसार बूथ लेव्हल अधिकारी (BLO) यांच्यामार्फत घरोघरी भेटीचा कार्यक्रम ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. मतदान केंद्रांचे तर्कसंगतीकरण व पुनर्रचना १७ ऑगस्ट २०२६ रोजी पूर्ण करण्यात येईल. मतदारयादीचा प्रारूप मसुदा २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केला जाईल. त्यानंतर २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. प्राप्त दावे व हरकतींवर सुनावणी आणि निकाली काढण्याची प्रक्रिया २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पार पडेल. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदारयादी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल, असे भारत निवडणूक आयोगामार्फत कळविण्यात आले आहे.

### पु. ल. कट्ट्यावर विजया बाईंच्या आठवणींचा जागर

मुंबई (दैनिक संध्या) : ज्येष्ठ दिग्दर्शिका, नाट्यगुरू विजया मेहता यांच्या आठवणींचा जागर शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ रोजी सायं. ६:३० वाजता पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या पु.ल. कट्ट्यावर करण्यात येणार आहे. विजया बाईंनी लिहिलेल्या काही आठवणी, त्यांच्याविषयीच्या दिग्गजांच्या मुलाखती, लेख यांचे अभिवाचन शुभांगी भुजबळ, अक्षय शिंपी, पल्लवी वाघ-केळकर सादर करणार आहेत. कार्यक्रमात ज्येष्ठ रंगकर्मी प्रतिमा कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती लाभणार असून त्याही यावेळी विजया बाईंच्या आठवणींना उजाळा देणार आहेत. अकादमीच्या चौथ्या मजल्यावरील बहुविध दालन येथे आयोजित या कार्यक्रमाला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अकादमीकडून करण्यात येत आहे.

# स्पर्धात्मक युगातील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी 'मानससूत्र' उपक्रम




■ मुंबई (दै. संध्या)

आजच्या स्पर्धात्मक, वेगवान आणि डिजिटल तंत्रज्ञानाने व्यापलेल्या शैक्षणिक वातावरणात विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याला विशेष महत्त्व देण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांमधील मानसिक तणाव, भावनिक असुरक्षितता तसेच वर्तणुकीतील बदलांची प्रारंभिक चिन्हे ओळखून त्यांना योग्य वेळी मार्गदर्शन व आवश्यक सहाय्य मिळावे, यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत राज्यातील सर्व महाविद्यालये व विद्यापीठांमधील अध्यापकांसाठी 'मानससूत्र' हा राज्यस्तरीय उपक्रम राबविण्यात येणार आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते मंत्रालय येथे 'मानससूत्र' उपक्रमाच्या अधिकृत पोस्टरचे अनावरण करण्यात आले. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबतच त्यांच्या भावनिक, सामाजिक आणि नैतिक विकासालाही प्राधान्य देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर केवळ समस्या निर्माण झाल्यानंतर समुपदेशन करण्याऐवजी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि संस्थाव्यापी मानसिक आरोग्य व्यवस्थेकडे वाटचाल करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांशी दैनंदिन संपर्कात असलेले अध्यापक विद्यार्थ्यांमधील वर्तणुकीतील किंवा भावनिक बदल सर्वप्रथम अनुभवतात. त्यामुळे मानसिक तणावाची प्रारंभिक लक्षणे ओळखणे, सहानुभूतीपूर्वक प्रतिसाद देणे आणि गरजेनुसार योग्य तज्ज्ञांकडे मार्गदर्शन करणे, ही अध्यापकांची भूमिका महत्त्वाची ठरते. याच उद्देशाने महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (एमएसएफडीए), पुणे यांच्या वतीने राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील अध्यापकांसाठी 'मानससूत्र' या महत्त्वाकांक्षी राज्यस्तरीय उपक्रमाची आखणी करण्यात आली आहे. या उपक्रमामध्ये

**अध्यापकांना विशेष प्रशिक्षण**

मानसशास्त्रीय पायाभूत संकल्पना, मार्गदर्शन व समुपदेशन, संकट व्यवस्थापन, डिजिटल स्वास्थ्य, समावेशक पद्धती तसेच भारतीय ज्ञान परंपरा यांची सांगड घालणारा बहुविद्याशाखीय दृष्टिकोन अवलंबण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमधील मानसिक तणाव व असुरक्षिततेची प्रारंभिक चिन्हे ओळखण्याची अध्यापकांची क्षमता बळकट करणे, मार्गदर्शन, समुपदेशन, समवयस्क सहाय्य व निर्देशन यंत्रणा विकसित करणे, संकट ओळख, तात्काळ प्रतिसाद आणि हस्तक्षेपोत्तर काळजी यासाठी व्यावहारिक कार्यनीती उपलब्ध करून देणे, तसेच भावनिकदृष्ट्या सुरक्षित, समावेशक आणि भेदभावरहित महाविद्यालयीन व विद्यापीठ परिसर निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे, ही या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

या उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय अध्यापक विकास कार्यक्रम दि. १० ऑगस्ट २०२६ ते दि. १२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील अध्यापकांसाठी हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. 'मानससूत्र' उपक्रमाच्या पोस्टर अनावरणप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणु गोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे उपस्थित होते.



# डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केला शोक

■ मुंबई (दै. संध्या)

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. शिक्षण, आरोग्य, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात डॉ. डी. वाय. पाटील यांनी उभारलेले कार्य सदैव स्मरणात राहील. आपल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वातून त्यांनी अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांची उभारणी करून असंख्य विद्यार्थ्यांना ज्ञान, शिक्षण व प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली, असे त्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी असून, त्यांच्या कार्याचा ठसा महाराष्ट्रासह देशाच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रावर कायम राहील. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक महान शिक्षणमहर्षी, दूरदृष्टीचे समाजसेवक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व गमावले आहे. त्यांची समाजाप्रती असलेली निष्ठा, कार्यतत्परता आणि लोककल्याणाची भावना भावी पिढ्यांना सदैव मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल, असेही राज्यमंत्री मिसाळ यांनी म्हटले आहे.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना, राज्यमंत्री मिसाळ यांनी त्यांच्या कुटुंबीयांच्या व आप्तेष्टांच्या दुःखात आपण सहभागी असल्याची भावना व्यक्त केली आहे. परमेश्वर दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण

■ मुंबई (दै. संध्या)

आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा

**■ पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन**

ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले. प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता.

# कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची प्रक्रिया पूर्ण करावी

मंत्री ॲड. आकाश फुंडकर : रायगडमधील गार्गी हुट्टेनेस अल्बर्टस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील कामगार प्रश्नांबाबत बैठक

■ मुंबई (दै. संध्या)

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील मे. गार्गी हुट्टेनेस अल्बर्टस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील पात्र कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची प्रक्रिया प्राधान्याने करण्याचे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. या कंपनीतील कामगारांच्या विविध प्रश्नांसंदर्भात मंत्री ॲड. फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात महत्वपूर्ण बैठक पार पडली.

विधान परिषद सदस्य भाई जगताप यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या कंपनीतील सुमारे ३०० कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे तसेच त्यांना कायम कामगारांप्रमाणे समान वेतन व सुविधा मिळावी, अशी मागणी भारतीय कामगार कर्मचारी महासंघामार्फत करण्यात आली होती. या बैठकीस भाई जगताप, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए. कुंदन, उपसचिव



(कामगार) स्वप्निल कापडणीस, कामगार आयुक्त एच. पी. तुम्मोड यांच्यासह कामगार संघटनेचे प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी कामगार मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले, कामगारांचे हित आणि त्यांच्या उदरनिर्वाहाचे संरक्षण करणे ही शासनाची प्राथमिकता आहे. समान कामासाठी समान वेतन हे तत्व लक्षात घेऊन संबंधित कंपनीने कामगारांच्या तक्रारींची वस्तुनिष्ठ पद्धतीने पडताळणी करावी. या प्रकरणी कोणत्याही कामगारावर अन्याय होणार नाही, याची शासन पूर्ण काळजी घेईल. अधिकाऱ्यांनी कायदेशीर तरतुदींनुसार सर्व बाबींची तत्परतेने पडताळणी करून याबाबतचा अहवाल विहित वेळेत सादर करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले, संबंधित कामगार संघटना आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यात सामोपचाराने व सकारात्मक चर्चेतून हा प्रश्न सोडवण्यात यावा. कामगारांच्या हक्कांबाबत शासन गंभीर असून, न्याय मिळवून देण्यासाठी सर्व स्तरांवर पाठपुरावा करण्यात येईल. जे कामगार कायमस्वरूपी सेवेसाठी पात्र आहेत, त्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची प्रक्रिया प्राधान्याने करावी. त्यासाठी कामगार संघटनाच्या प्रतिनिधीना विश्वासात घ्यावे आणि हा प्रश्न कालबद्ध पद्धतीने सोडवावा असे निर्देश मंत्री ॲड. फुंडकर यांनी यावेळी दिले.

# ज्युनियर कलाकारांच्या न्याय्य मागण्यांवर शासन सकारात्मक

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील ज्युनियर कलाकारांच्या वेतनवाढ, सेवा अटी तसेच कामगार हक्कांबाबत शासन संवेदनशील असून त्यांच्या सर्व न्याय्य मागण्यांवर नियमानुसार आणि कायदेशीर चौकटीत योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिली. ज्युनियर आर्टिस्ट असोसिएशनच्या प्रतिनिधींनी मंत्री फुंडकर यांची भेट घेऊन विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी त्यांनी प्रतिनिधींच्या मागण्या सविस्तरपणे ऐकून घेत संबंधित विषयाची गांभीर्याने दखल घेतली. यावेळी मंत्री फुंडकर म्हणाले, मनोरंजन क्षेत्रातील कनिष्ठ कलाकार हे या उद्योगाचा महत्त्वाचा घटक असून त्यांच्या श्रमांचा योग्य सन्मान होणे आवश्यक आहे. कामगारांचे हित, सुरक्षितता आणि न्याय्य वेतन ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता



असून संबंधित सर्व बाबींची सखोल पडताळणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. कामगारांचे हक्क अबाधित राहतील, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. कामगार विभागाच्या माध्यमातून संबंधित यंत्रणा, ज्युनियर आर्टिस्ट असोसिएशन आणि निर्माते संघटना यांच्यात समन्वय साधून सर्वमान्य व शाश्वत तोडगा काढण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. कामगारांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करून कायदेशीर तरतुदींनुसार निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील प्रत्येक कामगाराला सन्मानाने आणि सुरक्षित वातावरणात काम करण्याची संधी मिळावी, ही शासनाची भूमिका असून कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, असेही मंत्री फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

# शिवणीबांध मत्स्यबीज केंद्राबाबत शासन सकारात्मक; स्थानिक हित जपूनच निर्णय – मंत्री नितेश राणे

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील मत्स्यव्यवसायाचा विकास, स्थानिक मत्स्यव्यवसायिकांचे हित आणि शासकीय मालमत्तेचा प्रभावी उपयोग या तिन्ही बाबींचा समतोल साधणे ही शासनाची भूमिका आहे. शिवणीबांध मत्स्यबीज केंद्रासंदर्भात कोणताही निर्णय घेताना स्थानिक हितसंबंध, मत्स्यबीज उत्पादनाची आवश्यकता आणि सर्व संबंधित बाबींचा सखोल विचार करूनच पुढील कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्र, शिवणीबांध (ता. साकोली, जि. भंडारा) संदर्भातील स्थानिक नागरिक, मत्स्यव्यवसायिक आणि लोकप्रतिनिधींच्या भावना लक्षात घेऊन मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात सविस्तर




आढावा बैठक झाली. यावेळी आमदार अविनाश ब्राम्हणकर, आमदार परिणय फुके, मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन., आयुक्त प्रेरणा देशभ्रतार यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत शिवणीबांध मत्स्यबीज केंद्राची स्थापना, त्याची उत्पादन क्षमता, मत्स्यसंवर्धनातील भूमिका तसेच केंद्राशी संबंधित विविध बाबींचा आढावा घेण्यात आला. लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या निवेदनातील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# ३,२७६ कंत्राटी कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर नियुक्तीचा निर्णय – मंत्री दादाजी भुसे



■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील समग्र शिक्षा अभियानांतर्गत दीर्घकाळ कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. या निर्णयानुसार, ३० जून २०२६ रोजी दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीची कंत्राटी सेवा पूर्ण केलेल्या ३,२७६ कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करून त्यावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांच्या समायोजनाचा प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या विशेष सहकार्यामुळेच या कर्मचाऱ्यांना न्याय देणारा हा महत्त्वपूर्ण निर्णय घेणे शक्य झाले. राज्य शासनाने कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन सेवेचा विचार करून घेतलेला हा निर्णय अत्यंत दिलासादायक आहे, अशी प्रतिक्रिया शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या २२ जुलै २०२४ च्या बैठकीतील निर्देशानुसार नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशी तसेच मंत्रिमंडळाने २ जुलै २०२६ रोजी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित कर्मचाऱ्यांच्या सध्याच्या पदांची शालेय शिक्षण विभागातील किंवा इतर विभागांतील नियमित मंजूर पदांशी समकक्षता निश्चित करून वेतनश्रेणी ठरविण्यात येणार आहे.

या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांना समकक्ष पदांच्या सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीचा लाभ मिळणार असून, त्यांचे विद्यमान वेतन संरक्षित राहील. तसेच मूळ वेतनाबरोबर महागाई भत्ता आणि प्रवास भत्ता देय राहणार आहे. मात्र, पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना तसेच निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतन योजना लागू राहणार नसल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. ही अधिसंख्य पदे व्यक्तीसापेक्ष असतील. संबंधित कर्मचारी सेवेत असेपर्यंतच ही पदे अस्तित्वात राहतील आणि हे पद रिक्त झाल्यास ती आपोआप व्यपगत होतील. तसेच या पदांवर नव्याने नियुक्ती करता येणार नाही. हा निर्णय अपवादात्मक परिस्थितीत केवळ एकदाच लागू करण्यात आला असून इतर कोणत्याही योजना किंवा विभागासाठी तो पूर्वोदाहरण म्हणून वापरता येणार नसल्याचे विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### माय माऊली निघाली पंढरी' भावगीताचे आळंदीत भक्तिमय वातावरणात प्रकाशन

**आळंदी : दैनिक संध्या**

आळंदीतील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात रविवारी भक्तिमय वातावरणात 'माय माऊली निघाली पंढरी' या भावगीताचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. वारकरी, भाविक आणि मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. या सोहळ्यास हभप नारायण महाराज जाधव, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, सुरेश वडगावकर, डि.डि. भोसले, सचिन गिलबिले, रामचंद्र भोसले, सोमनाथ कुऱ्हाडे, दिनेश घुले, सुरेश झोंबाडे, उज्वला काळे, संकेत वाघमारे, आनंद रणदिवे, उमेश बागडे आणि मान्यवर उपस्थित होते. भावगीताची संकल्पना व गीतलेखन आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी केले असून, नागेश आडगावकर यांनी स्वर दिले आहेत. रोहन पंढरपूरकर यांचे संगीत संयोजन लाभले आहे. गीतामधून माऊलींच्या प्रस्थानानंतर वारकऱ्यांच्या मनातील विरहभावना आणि भक्तिभावाचे चित्रण करण्यात आले आहे. उपस्थित मान्यवरांनी गीताचे कौतुक करत संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.

### वाल्हे येथील महिलेचा अपघातात मृत्यू

**वाल्हे : दैनिक संध्या**

तीर्थक्षेत्र जेजुरीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ रस्ता ओलांडताना चार चाकी वाहनाची धडक बसून झालेल्या अपघातात वाल्हे (पुरंदर) येथील ६५ वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. बायडाबाई बळीराम वाघमारे असे अपघातात मृत्यू पावलेल्या महिलेचे नाव आहे. सदर महिला मंगळवारी (४ऑगस्ट) सकाळी ११च्या सुमारास जेजुरी येथील एका हॉटेलमध्ये काम करण्यासाठी जात असताना छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ रस्ता ओलांडताना जेजुरीहून सासवडकडे निघालेल्या स्विफ्ट कारने त्यांना वैष्णवी ग्राफिक्स दुकानासमोर जोरदार धडक दिली. यावेळी झालेल्या अपघातात बायडाबाई वाघमारे ह्या गंभीर जखमी झाल्याने त्यांना ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थी हलविण्यात आले होते. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे ग्रामीण रुग्णालयाच्या डॉक्टरांनी जाहीर केले. या घटनेची फिर्याद राजेंद्र चव्हाण रा.वाल्हे (वाल्मिकनगर) यांनी जेजुरी पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी स्विफ्ट गाडीचा चालक संदीप इंदलकर रा. जेजुरी यांच्या विरोधात अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार अतुल पखाले हे करीत आहेत.

### IX Global कंपनीविरोधात नारायणगाव पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल

**नारायणगाव : दैनिक संध्या**

नारायणगाव पोलीस ठाण्यात IX Global या कंपनीसह तिचे अॅप आणि संबंधित कंपन्यांविरोधात ऑनलाइन गुंतवणुकीच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यापूर्वी दाखल झालेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान IX Global कंपनीचे अॅप, TP Global FX, Crypto Land, Debt Box, FX Opulence आदी माध्यमांतून नागरिकांना जास्त परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करण्यात आल्याचे समोर आले आहे. संबंधित कंपन्यांनी दरमहा ५ ते २५ टक्के नफ्याचे आश्वासन देत मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमांनुसार तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तपासादरम्यान मोठ्या प्रमाणात पुरावे व कागदपत्रे पोलिसांच्या हाती लागल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणातील साक्षीदार सुनील रघुनाथ पाटोळे रा.वारूळवाडी यांचा जबाब नोंदविण्यात आला आहे. त्यांना वरील वेगवेगळ्या अॅप मध्ये पैसे गुंतवायला लावून मोठा परतावा मिळेल असे आमिष दाखवून त्यांची वेळोवेळी १,९३,३९,७८२ रुपयांची फसवणूक झाली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक, नारायणगाव पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, आरोपींच्या सहभागाबाबत अधिक माहिती व पुरावे संकलित करण्याचे काम सुरू आहे.



### गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुजनांना कृतज्ञतेचा अभिवादन सोहळा

**नारायणगाव : दैनिक संध्या**

गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, नारायणगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाला विद्यामंदिराच्या उपमुख्याध्यापिका मानसी भालेराव, उपप्राचार्य संजय वलटे, पर्यवेक्षक सुनील ढवळे, वाणिज्य विभाग प्रमुख अरुण हिंगे, विज्ञान विभाग प्रमुख नितीन पोखरकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी संतोष देशपांडे, तसेच वनिता जगताप, साहेबराव गाळव, जयश्री कोल्हे, मनीषा देशमुख, ज्योती वाबळे आणि शैलेश कावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आजी-माजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त करून राष्ट्रीय सेवा योजनेतील अनुभव आणि गुरुजनांकडून लाभलेल्या संस्कारांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रणव तिवारी यांनी केले. प्रास्ताविक जयश्री कोल्हे यांनी केले. प्रमुख पाहुणे यांचा परिचय साहेबराव गाळव यांनी करून दिला. उपमुख्याध्यापिका सौ. मानसी भालेराव यांनी गुरुपौर्णिमेचे आध्यात्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक महत्त्व विशद केले. पर्यवेक्षक सुनील ढवळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी हे सुसंस्कारित, जबाबदार आणि सुजाण भारताचे नागरिक असल्याचे प्रतिपादन केले. मनीषा देशमुख यांनी गुरु-शिष्य नात्यातील विश्वास, आदर, संस्कार आणि समर्पण यांचे महत्त्व स्पष्ट केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी संतोष देशपांडे यांनी गुरुंच्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा मिळते, असे सांगून गुरुंचे जीवनातील अनन्यसाधारण स्थान अधोरेखित केले. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माजी स्वयंसेवकांना एनएसएसची प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या उपक्रमामुळे माजी विद्यार्थ्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी वनिता जगताप यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक, माजी विद्यार्थी व स्वयंसेवकांचे आभार मानले. गुरुजनांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

# गुन्हेगारांचे उदात्तीकरण खपवून घेणार नाही

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांचा 'सोशल मीडिया'वरही वॉच

**येरवडा कारागृहाच्या भिंतीजवळ फटाके फोडून आरोपीचा वाढदिवस साजरा करणाऱ्यावर कारवाई**

■ पुणे (दै. संध्या)

गुन्हेगारांचे उदात्तीकरण करणारे व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात येरवडा पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. येरवडा मध्यवर्ती कारागृहात असलेल्या आरोपीच्या वाढदिवसानिमित्त कारागृहाच्या संरक्षण भिंतीजवळ फटाके फोडून त्याचे उदात्तीकरण केल्याप्रकरणी एका आरोपीला येरवडा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. येरवडा कारागृहासारख्या अतिसंवेदनशील परिसरात कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या प्रकारांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका गित्ते यांनी घेतली आहे. प्रत्यक्ष रस्त्यावरील गुन्हेगारीबरोबरच समाजमाध्यमांच्या माध्यमातून गुन्हेगारांची प्रतिमा मोठी करण्याचा किंवा त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवरही येरवडा पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार येरवडा कारागृह परिसरात पोलिसांकडून सतर्क गस्त सुरू होती. ४ ऑगस्ट रोजी तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड आणि त्यांचे पथक गस्त घालत असताना, एका गुन्ह्यात पाहिजे असलेला शंकर बाळासाहेब भालके (वय १९, रा. धनकवडी, पुणे) हा पोस्ट ऑफिस चौकात येणार असल्याची माहिती गोपनीय बातमीदाराकडून मिळाली. त्यानुसार पथकाने तातडीने सापळा रचून भालके याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता येरवडा मध्यवर्ती कारागृहात असलेल्या सुलतान सय्यद याच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या मित्रांनी कारागृहाच्या संरक्षण भिंतीलगत फटाके फोडल्याची माहिती समोर आली. फटाके फोडताना वाहतुकीला अडथळा निर्माण करण्यात आला तसेच नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होईल अशा पद्धतीने हा प्रकार करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

इतकेच नव्हे, तर या प्रकाराचे चित्रीकरण करून संबंधित व्हिडीओ मित्रांच्या इन्स्टाग्राम खात्यांवर प्रसारित करण्यात आले. कारागृहात असलेल्या आरोपीच्या गुन्हेगारीचे उदात्तीकरण करण्याच्या उद्देशाने हा प्रकार केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**'गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणाऱ्यांवर कठोर कारवाई'**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या नेतृत्वाखाली येरवडा पोलिसांनी गुन्हेगारांचे समाजमाध्यमांवरील उदात्तीकरण रोखण्यावर विशेष भर दिला आहे. गुन्हेगारांना प्रोत्साहन देणारे, त्यांच्या समर्थनार्थ व्हिडीओ तयार करणारे अथवा असे व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा येरवडा पोलिसांनी दिला आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त चिलुमूला रजनिकांत, सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापुरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते आणि पोलीस निरीक्षक केशव दिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड, पोलीस हवालदार पिलाणे, मुकुंद कोकणे तसेच पोलीस अंमलदार शैलेश वाबळे, बालाजी सोगे, संदीप जायभाये, नटराज सुतार, गणेश पालवे, साईनाथ म्हस्के, अनिल मन्हाळकर आणि सोमनाथ गायकवाड यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

## नळवणे मार्गावरील एसटी सेवा पूर्ववत करण्याची मागणी

■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील नळवणे ग्रामपंचायतीने महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाकडे एक महत्त्वाची मागणी केली आहे. पुणे-मंचर-रांजणी-बेल्हे-नळवणे या मार्गावर पूर्वीप्रमाणे नियमित एसटी बस सेवा त्वरित सुरू करण्यात यावी, यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.

सध्या या मार्गावरील बस सेवा बंद असल्यामुळे स्थानिक ग्रामस्थ, शाळा-महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी आणि भाविकांचे प्रचंड हाल होत आहेत. बस सुविधेअभावी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दररोज सुमारे चार किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. नळवणे हे गाव पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या सीमेवर असून, येथे प्रसिद्ध कुलदैवत खंडोबा मंदिर आहे. त्यामुळे येथे दर्शनासाठी भाविकांची नेहमीच मोठी गर्दी असते. वाहतूक व्यवस्था कोलमडल्याने या सर्वांनाच मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामपंचायतीने निवेदनात म्हटले आहे की, यापूर्वी २०१९ पूर्वी पुणे-मंचर- रांजणी-निमगाव सावा-बेल्हे-नळवणे या मार्गावर नियमित बस सुरू होती.

ही सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे अनेकदा तोंडी व लेखी मागण्या करण्यात आल्या, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. जर प्रशासनाने ही बस सेवा लवकरात लवकर पूर्ववत सुरू केली नाही, तर ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## नव्याने पात्र सनदी लेखापालांना करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन

■ जेजुरी (दै. संध्या)



इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय)च्या उद्योग व व्यवसाय क्षेत्रातील सदस्य समितीच्या वतीने आयोजित ६५ वा परिसर मार्गदर्शन कार्यक्रम आयसीएआयच्या पश्चिम भारत प्रादेशिक परिषदेच्या पुणे शाखेतील आयसीएआय भवन, बिबवेवाडी येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात नव्याने पात्र ठरलेल्या १६४ सनदी लेखापालांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमात प्रा. सीए. डॉ. महादेव हरुबाई साहेबराव जाधव यांनी "शिक्षण क्षेत्रातील संधी आणि सनदी लेखापालांसाठी उदयोन्मुख विविध नवीन क्षेत्रे" या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षण क्षेत्रातील वाढत्या संधी, व्यावसायिक मूल्यांचे महत्त्व, नव्या करिअरच्या दिशा तसेच भविष्यातील रोजगाराच्या संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनाचा नव्याने पात्र झालेल्या सनदी लेखापालांना स्वतंत्र व्यवसाय, नोकरी तसेच करिअरची योग्य निवड करण्यासाठी निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी सनदी लेखापाल व्यवसायातील मूलभूत व्यावसायिक मूल्यांवर विशेष भर देण्यात आला. स्वायत्तता, सचोटी, विश्वासार्हता तसेच उत्कृष्टता आणि उत्तरदायित्व ही मूल्ये जपणे हे प्रत्येक सनदी लेखापालाचे कर्तव्य असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

उद्घाटन समारंभास सीए. चंद्रशेखर व्ही. चितळे (कार्यक्रम संचालक व केंद्रीय परिषद सदस्य) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रमुख अतिथी म्हणून सीए. विष्णुकुमार अग्रवाल (केंद्रीय परिषद सदस्य) उपस्थित होते. त्यांनी उद्योग, व्यवसाय आणि व्यावसायिक सेवांमधील अनुभव सहभागींसमोर मांडले. कार्यक्रमात सीए. प्रवीण शाह यांनी मानव संसाधन विभागातील मुलाखतीसाठी आवश्यक तयारी, तर सीए. अर्पित काबरा (केंद्रीय परिषद सदस्य व आयसीएआय नियुक्ती संचालनालयाचे अध्यक्ष) यांनी आयसीएआयची ओळख व नियुक्ती संचालनालयाची भूमिका या विषयांवर मार्गदर्शन केले.

## सोनालिकाने ११,४४२ ट्रॅक्टर्सची सर्वोत्तम एकंदर विक्रीची नोंद

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने आर्थिक वर्ष २०२७ मधील आपली दमदार कामगिरी कायम ठेवली असून, जुलै महिन्यात एकंदर ११,४४२ ट्रॅक्टर्सची विक्री नोंदवत आजवरची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. उद्योगातील अग्रगण्य अशा देशांतर्गत २७.२ टक्के वाढीमुळे हे शक्य झाले असून कंपनीने देशांतर्गत उद्योगाच्या कामगिरीला १.३ पटीने मागे टाकले आहे. शेतकऱ्यांसाठी वैयक्तिकरीत्या तयार केलेल्या उत्पादनांमुळे ही कंपनी देशांतर्गत बाजारपेठेत सर्वाधिक बाजारहिस्सा मिळवणारी कंपनी बनली आहे. या विक्रमी कामगिरीने सोनालिकाच्या 'ग्राहक प्रथम' या धोरणाला प्रत्यक्षात उतरवण्याच्या क्षमतेवर शिक्कामोर्तब केले आहे. हे धोरण



नाविन्य, कार्यवाहीतील उत्कृष्टता आणि शेतीच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर उत्तम मूल्य प्रदान करण्यावर आधारित आहे. पुन्हा सुरू झालेला मान्सून आणि खरीप पेरणीतील प्रगती सुरू असतानाच शेतकरी आगामी हंगामासाठी सक्रिय पावले उचलत आहेत. अशा वेळेस कमी कालावधीत उत्पादकता वाढवण्यासाठी उच्च अश्वशक्तीच्या (HP) ट्रॅक्टर्सकडे स्पष्ट कल दिसून येत आहे. सोनालिकाचा संपूर्ण उत्पादन पोर्टफोलिओ शेतकऱ्यांना त्यांच्या भरभराटीसाठी आवश्यक असलेली कार्यक्षमता, विश्वसनीयता आणि तंत्रज्ञान देऊन सक्षम करण्यासाठीच तयार करण्यात आला आहे. या विक्रमी कामगिरीविषयी बोलताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले,जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टर्सकडे मागणी हळूहळू वाढत असल्यामुळे, आज शेतकरी त्यांच्या भविष्याच्या सुरक्षिततेसाठी कार्यक्षम, विश्वासार्ह कामगिरी करणाऱ्या आणि अधिक उत्पादकतेची हमी देणाऱ्या ट्रॅक्टर्समध्ये मोठी गुंतवणूक करत आहेत. आगामी सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आमची उत्पादने पूर्णपणे सज्ज असतील, हे सुनिश्चित करण्यावर आम्ही लक्ष केंद्रित केले आहे.

## बेकायदेशीर बियाणेवर धडक

■ पुणे (दै. संध्या)

उरुळी कांचन व शिंदवणे परिसरातील बियाणे,खते व किटकनाशके विक्रेत्यांच्या मनमानी आणि बेकायदेशीर कारभारावर कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकाची धडक कारवाई. निलंबनाचा आदेश धुडकावून बेकायदेशीरपणे बियाणे विकणारे उरुळी कांचन येथील'साई शेती भांडार'आणि मुदत संपलेला परवाना वापरून अनाधिकृत ठिकाणी खते व किटकनाशकांची विक्री करणारे शिंदवणे येथील'कौशल्या शेती भांडार'या दोन दुकानदारांविरोधात उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिल्या घटनेत जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक धनंजय दिनकर पाटील(वय-५५ रा.पुणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार उरुळी कांचन येथील पुणे-सोलापूर रस्त्यावर पोलीस ठाण्यासमोर असलेल्या'साई शेती भांडार'या दुकानाची १६ जुलै २०२६ रोजी तपासणी करण्यात आली होती.त्यावेळी साठा नोंदवही न ठेवणे,परवान्यात उत्पादक कंपनीचा समावेश नसने आणि इतर गंभीर त्रुटी आढळून आल्या होत्या. याप्रकरणी परवाना अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पुणे यांनी २२ जुलै रोजी सुनावणी घेऊन'साई शेती भांडार'चा बियाणे विक्री परवाना १५ दिवसांसाठी निलंबित केला होता, असे असतानाही रविवारी (ता.०२) सायंकाळी ६ वाजता भरारी पथकाचे धनंजय पाटील,कृषी अधिकारी अशोक वेताळ आणि मोहीम अधिकारी विनय कदम यांनी अचानक दुकानाची पाहणी केली.

# भव्य रक्तदान शिबिर, आयुर्वेदिक तपासणी व सन्मान सोहळ्याचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)




सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानासारख्या जीवनदायी कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्याच्या उद्देशाने सुजय प्रतिष्ठान, मैत्री रक्ताची यांच्या वतीने कै. सुजय सुरेश सकपाळ यांच्या १३ व्या स्मृतीप्रित्यर्थ भव्य रक्तदान शिबिर, आयुर्वेदिक आरोग्य तपासणी शिबिर व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत उद्यान मंगल कार्यालय, खजिना विहीर चौक, सदाशिव पेठ, पुणे येथे संपन्न होणार आहे.अशी माहिती पत्रकार परिषदेत सुजय प्रतिष्ठानचे संस्थापक मा. श्री. सुरेश ग. सकपाळ यांनी दिली. पुणे श्रमिक पत्रकार भवन ला झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. किसन भोसले – (प्रसिद्ध उद्योजक),डॉ. विठ्ठल जाधव (IPS– विशेष पोलीस महानिरीक्षक सेवानिवृत्त), श्री सुनील मोरे,श्री हेमंत सोनवणे,श्री सागर भंडारी,श्री हरिभाऊ सपकाळ,श्री. सुधीर सकपाळ – (संस्थापक, सुजय प्रतिष्ठान – मैत्री रक्ताची), उपस्थित होते. या उपक्रमात नागरिकांसाठी भव्य रक्तदान शिबिर, मोफत आयुर्वेदिक आरोग्य तपासणी, अल्पदरात आयुर्वेदिक औषधांचे वितरण तसेच मोफत कांस्यथाळी मसाज यांची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळू शकते. त्यामुळे युवकांसह सर्व नागरिकांनी या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. किसनजी भोसले हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. मेघराज राजेभोसले (अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ), मा. श्री. शिवकुमारजी साळुंखे (आयआरएस) तसेच डॉ. विठ्ठल जाधव (आयपीएस), विशेष पोलीस महानिरीक्षक (सेवानिवृत्त) उपस्थित राहणार आहेत. याशिवाय प्रशासकीय, सामाजिक, वैद्यकीय, चित्रपट, पत्रकारिता, उद्योग, शिक्षण आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे. कार्यक्रमादरम्यान समाजसेवा, रक्तदान, पत्रकारिता, शिक्षण, कला, गायन, सामाजिक कार्य आदी क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा 'सेवारत्न' व 'समाजगौरव' पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. तसेच समाजहितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या विविध सामाजिक संस्थांचाही विशेष सन्मान करण्यात येणार असून, त्यांच्या कार्याची दखल घेऊन समाजासमोर प्रेरणादायी उदाहरण उभे करण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे.या उपक्रमासाठी ग्रामविकास मंडळ-गांजवणे, पोलादपूर तालुका रहिवासी संघ, शांतिदूत परिवार, कोकणवासीय महासंघ, एस.एस. धोत्रे फाउंडेशन, युवा अस्मिता फाउंडेशन, विश्व हिंदू मराठा संघ, जनकल्याण फाउंडेशन, संकल्प सारथी संस्था, कोकण भूमिपुत्र/कन्या युवा सामाजिक प्रतिष्ठान, अखिल कोकण युवा संघ पुणे शहर, गावदेवी प्रतिष्ठान-गांजवणे यांसह अनेक सामाजिक संस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन सुजय प्रतिष्ठानचे संस्थापक मा. श्री. सुरेश ग. सकपाळ व सुधीर ग. सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, समाजातील सर्व नागरिकांनी या सामाजिक उपक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे, मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घ्यावा आणि पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहून समाजोपयोगी कार्याला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन सुजय प्रतिष्ठान, मैत्री रक्ताची यांच्या वतीने करण्यात आले आहे.